गुन्हेगारीचा कर्दनकाळ

क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ९ अंक : २० सोमवार दि. १० मे २०२१ ते रविवार दि. १६ मे २०२१ पाने : ४ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड

॥ जय माता जी ॥

॥ माता बारोंडादेवी प्रसन्न ॥

संपादकीय

तिसऱ्या लाटेचा बागुलबुवा!

कोरोनाच्या पहिल्या आणि दुसऱ्या लाटेने जगात हाहाकार माजवलेला असतानाच आता तिसरी लाट येणार आहे असं सांगितले जात आहे आणि ही तिसरी लाट पहिल्या दोन लाटा पेक्षा अधिक भयंकर असणार आहे. या लाटेचा सर्वाधिक फटका लहान मुलांना बसणार आहे असेही सांगितले जात आहे. त्यामुळे लोकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. कोरोनाच्या बाबतीत सांगायचे झाल्यास समाजात कोरोना विषयी समाजात अनेक गैरसमज पसरवण्यात आलेत. या वेग वेगळ्या प्रकारच्या गैर समजामुळे लोकांमध्ये भीती निर्माण झाली होती आणि कित्येक लोक या भीतीनेच मेले आहेत. आपल्याला कोरोना झाल्यास आपण जगूच शकत नाही, या भीती पोटी काही लोकांनी कोरोना चाचणी सुद्धा करून घेतली नाही. तर काही लोकांना दुसरा कुठलाही आजार झाला असला तरी ते दवाखान्यात किंवा मोठ्या रुग्णालयात जायला तयार नाहीत. परिणामी उपचार अभावी घरातच त्यांचा मृत्यू होतोय आणि म्हणूनच सरकारने किंवा समाजातील लोकांनीही कोरोना बाबत भीती किंवा अफवा पसरवणे थांबवायला हवे. कोरोनाची तिसरी लाट येणार आणि ती लहान मुलांसाठी जास्त धोकादायक असेल अशा प्रकारच्या बातम्या प्रसारमाध्यमांमध्ये येवू लागल्याने लोक दहशतीखाली आहेत. मात्र तिसऱ्या लाटेच्या सत्यतेबद्दल वैद्यकीय क्षेत्रातून सुद्धा पुरवठा निशी काही सांगितले जात नसल्याने संभ्रमाचे वातावरण आहे. काही लोकांना तर वाटत आहे की लॉकडाऊन दोन ते तीन महिने वाढवण्यासाठीच कोरोनाच्या तिसऱ्या लाटेचा बागुलबुवा केला जातोय आणि हे जर खरे असेल तर सरकार संकटाच्या काळात सुद्धा लोकांची कशा प्रकारे फसवणूक करीत आहे हेच दिसून येतेय. सरकारने किंवा सरकारने नेमलेल्या डॉक्टरांच्या टास्क फोर्सने लोकांना धीर द्यायला हवा. कोरोना बाबतची वस्तुस्थिती आणि कोरोनापासून बचाव कसा करायचा याबाबत लोकांना मार्गदर्शन करायला हवे. पण तसे न करता लोकांना भीती दाखवली जातेय आणि या भीतीमुळे आणखी काही लोकांचा जीव जाण्याची शक्यता आहे. कारण ज्याचं हृदय कमजोर आहे ज्यांना हृदयविकाराचा किंवा उच्च रक्तदाबाचा त्रास आहे असे लोक कोरोना बाबतच्या स्फोटक बातम्या सहन करू शकत नाही. कोरोनाच्या भीती त्यांच्यासाठी जीवघेणी ठरू शकते. म्हणूनच सरकारने कोरोनाच्या तिसऱ्या लाटेची भीती दाखवून लोकांना जास्त घाबरवू नये. बघुया तिसरी लाट आली तरी सरकार लोकांच्या मदतीने या संकटाचा मुकाबला करील. पण अगोदरच तिसऱ्या लाटेची भीती दाखवली तर लोक गर्भगळीत होऊन भीतीनेच प्राण सोडतील. वाढता प्रादुर्भाव आणि तो रोखण्यात वैद्यकीय यंत्रणा आणि सरकारला येत असलेले अपयश हे सगळं कधी कधी संशयास्पद वाटायला लागते आणि त्याचा संबंध मानवी अवयवांची तस्करी करण्याशी तर नाही ना? असे आता लोकांना वाटू लागले आहे. कारण कोरोना मृत्यू झालेल्या माणसाची बॉडी त्याच्या कुटुंबियांच्या ताब्यात दिली जात नाही. बॉडीचा चेहराही दाखवला जात नाही. त्यामुळे ती बॉडी आपल्याच माणसाची आहे हे कशावरून असे नातेवाईक विचारतात. कारण आतापर्यंत खाजगी रुग्णालयांमध्ये मृत कोरोना बाधीत असल्याचे सांगून दुसऱ्याच रोगाने मेलेल्याचे अवयव काढून घेतल्याच्या घटना उघडकीस आल्या आहेत. त्यामुळे कोरोनाच्या नावाखाली मृतांचे अवयव काढून घेण्याचा हा व्यापार सुरू असावा आणि त्यात डॉक्टरांसह राजकारणी आणि प्रशासकीय वैद्यकीय सेवेतील अधिकारीही सामील असावेत असे बोलले जात आहे. या कोरोनाच्या संकट काळात ५५ वर्षांवरील वृद्ध व्यक्ती मृत्युमुखी पडल्या होत्या. मात्र त्यांच्या अवयवांचा तितकासा व्यावसायिक फायदा होत नसावा. त्यामुळे या रॅकेटमध्ये सामील असलेल्या लोकांनी कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत तरुणांना लक्ष्य केले असावे. कारण दुसऱ्या लाटेत मोठ्या संख्येने तरुण कोरोनाग्रस्तांचा मृत्यू झाला होता. कारण तरुणांचे अवयव अधिक सक्षम आणि व्यावसायिक दृष्ट्या फायदेशीर असतात. पण आता तिसऱ्या लाटेत लहान मुलांना धोका असल्याचे सांगितले जाते आहे. अवयवांचा व्यापार करणाऱ्यांसाठी मानवी शरीर हे फक्त व्यवसायाचा भाग असते म्हणूनच तिसऱ्या लाटेचा बागुलबुवा करून आता लहान मुलांच्या अवयवांवर तर या लोकांचा डोळा नाहीना? असा संशय लोक व्यक्त करीत आहेत. सरकारकडून कोरोनाग्रस्त मेलेल्या माणसाच्या बोडीतून कोरोनाचे संक्रमण होऊ शकते म्हणून बॉडी नातेवाईकांना देऊ नका असे त्यांनी सांगितले आहे. त्यामुळेच अवयवांच्या छुप्या मार्केटिंगला चालना मिळाली आहे, पण प्रत्यक्षात जेंव्हा कोरोना बाधित मृतदेहाचे शवविच्छेदन बाहेरच्या देशात करण्यात आले तेंव्हा बॉडी मधून कोणत्याही प्रकारचे कोरोना विषाणू बाहेर पसरत नसल्याचे निदर्शनास आले आहे आणि तसे असेल तर नातेवाईकांना बॉडी सोपवण्यात काय हरकत आहे.

आरोग्य यंत्रणेच्या निष्काळजीपणाला कधी घडणार अद्दल लातूर येथील रुग्णालयात झाली मृतदेहांची अदला बदल

लातूर/राम पाटोळे

कोरोनाच्या संकट काळात एकीकडे काही रुग्णालयांमधील डॉक्टर आणि इतर वैद्यकीय कर्मचारी कोरोना योद्धे बनून दिवस-रात्र जीवाचे रान करून कोरोना बाधितांना वाचवण्याचा प्रयत्न करीत आहेत. तर दुसरीकडे काही रुग्णालयांमध्ये तिथले कर्मचारी आणि डॉक्टर यांच्या निष्काळजीपणामुळे कोरोना रुग्णांवरील उपचारामध्ये हेडसाळ होऊन रुग्ण बरे होण्याऐवजी मृत्युमुखी पडत आहेत. संपूर्ण महाराष्ट्रातील रुग्णालयांमध्ये कोविड रुग्णांसाठी ८० टक्के बेड राखीव आहेत. तरीही बेड कमी पडत असल्याने अनेक मोकळ्या जागांमध्ये इमारतींमध्ये शाळांमध्ये कोविड सेंटर तयार करण्यात आले आहेत. पण तिथली स्थिती इतकी भयंकर आहे. काही ठिकाणी रुग्णांना जेवण मिळत नसल्याने ते पळून जात आहेत, तर काही ठिकाणी महिला कोरोना रुग्णांचा विनयभंग झालाय, काही ठिकाणी रुग्णांनी आत्महत्या केल्यात आणि त्यांचे मृतदेह चार चार दिवस बाथरूममध्ये पडून होते. पण रुग्णालय प्रशासनाला त्याचा पत्ताच नाही. नाशिकमध्ये कोविड रुग्णालयात ऑक्सिजनची गळती होऊन २९ रुग्णांना प्राण गमवावा लागला, तर विरारमध्ये रुग्णालयाला आग लागून १४ कोरोना बाधितांचा मृत्यू झाला. कुठे ऑक्सिजनची कमतरता तर कुठे रॅमिडेसिव्हरचा तुटवडा, असा सावळा गोंधळ सुरु आहे. एका रुग्णालयात तर मृत पावलेल्या कोरोना रुग्णाच्या खिशातले पैसे तिथल्या वॉर्डबॉयनी काढून घेतल्याची तसेच रुग्णालयातून रेमडेसिवीर इंजेक्शन चोरून नेल्याच्या घटनाही घडल्या आहेत. अशा अनागोदी कारभाराने कोरोना आटोक्यात येणार आहे का?

सगळ्यात संतापजनक बाब म्हणजे रुग्णालय प्रशासनाचे रुग्णालयातील कारभारावर लक्षच नसल्यामुळे मृतदेहांची सुद्धा अनेक ठिकाणी अदलाबदल होतेय आणि सरकारला मात्र याच्याशी काहीच घेणे देणे नसल्यासारखे सरकार अशा प्रकारांकडे दुर्लक्ष करीत आहे. कोरोनाचे मृतदेह नातेवाईकांना दाखवले सुद्धा जात नाहीत. मग त्यांचा माणूस कोरोनाने मेलाय हे त्यांनी कसे समजायचे आणि याचाच फायदा काही खाजगी रुग्णालयांनी घेऊन अगोदर अवाच्या सव्वा उपचाराचे बिल वाढवले आणि नंतर तो माणूस मेल्यावर ... पान २ वर

अरेच्च्या सासूचा लागला जावयाला लळा भांडण होताच त्याने तिचा आवळला गळा

आरोपी असिफ

पुणे/क्राईम रिपोर्टर

आजकाल लोक इतके वासनांध झालेत कि क्षणिक सुखाच्या मोहापायी त्यांना नात्याचीही ओळख राहत नाही. त्यातूनच दीर भावजय, मेव्हणा-मेव्हणी यांच्यात अनैतिक संबंध सुरु होतात. मात्र ते कधीच लपून राहत नाहीत आणि ज्या दिवशी ते उघडकीस येतात तेंव्हा त्यातून एखाद्याचा बळी गेलेला असतो. बेळगावच्या हुक्केरी येथे राहणाऱ्या आसिफ आतार याचे चक्क त्याच्या सासूबरोबरच अनैतिक संबंध जुळले आणि सासूला घेऊन तो पुण्याला आला. मात्र लोकडाऊनच्या काळात त्याला कामधंदा मिळेना. त्यामुळे त्याची व सासू आणि मेव्हणीची उपासमार होऊ लागली. त्यामुळे त्यांच्यात भांडणे होऊ लागली आणि याच भांडणातून एकेनदिवशी जावयाने आपल्या सासूचा गळा आवळून तिला ठार मारले. मात्र पोलिसांनी या लंपट जावयाला बेड्या ठोकून त्याच्या जगावेगळ्या प्रेमकहाणीचा शेवट केला.

बेळगाव जिल्हयातील हुक्केरी येथील असिफ दस्तगीर अतार याचा बेळगाव येथील अनारकली तेरणे याच्या मुलीशी गेल्या काही वर्षापूर्वी समाजाच्या रितीरिवाजाप्रमाणे निकाह झाला. असिफ याला अनारकली याच्या मुलीपासून एक मुलगा व एक मुलगी अशी दोन अपत्ये झाली. गेली काही वर्ष त्या दोघांचा संसार सुरळीत चालू असताना त्या दोघा नवरा बायकोत गेल्या काही वर्षापासून वाद आणि भांडणाला सुरूवात झाली होती. नवरा बायकोचे कोणत्याच कारणातून पटत नव्हते. असिफ याची बायको त्याच्याबरोबर भांडण काढून सारखी आपल्या माहेरी ... पान २ वर

केदारे बंधूनी डाव साधून घात केला जमिनीच्या वादातून माजी उपसरपंच मेला

मयत शिंदे

पैठण/क्राईम रिपोर्टर

शेती हाच ग्रामीण भागातील जनतेचा मुख्य व्यवसाय असल्याने प्रत्येक शेतकऱ्याचे आपल्या जमिनीवर मुलांसारखे प्रेम असते. त्यामुळे आपली एक इंचही जमीन कोण सोडायला तयार नसतो. अशावेळी जमिनीवर कोणी अतिक्रमण केले किंवा शेतातून पायवाट काढण्याचा प्रयत्न केला तर प्रचंड वाद होतो आणि जमिनीच्या या वादातून एखाद्याचा जीवही जातो. पैठणजवळच्या गाढेगावातील माजी उपसरपंच कांताराव शिंदे यांचा केदारे कुटुंबाशी असाच जमिनीवरून वाद होता आणि याच वादातून त्यांची भांडणे आणि मारामाऱ्या व्हायच्या. एकेदिवशी याच वादातून कांताराव यांनी अनिल केदारला मारहाण केली होती. त्याचा राग मनात ठेवून केदारे बंधूनी कांताराव यांचे अपहरण करून त्यांची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी सर्व आरोपीना अटक केली आहे. ... पान २ वर

मुलगी झाली पण अपशकुनी ठरली बापाने तिचा छळ करून ठार मारली

जळगाव/क्राईम रिपोर्टर

ग्रामीण भागात शिक्षणाचा अभाव आणि जुनाट रूढी परंपरांचा पगडा यामुळे माणसावर बुरसटलेल्या विचारांचा प्रभाव असतो आणि त्यातूनच अंधश्रद्धेचे भूत त्याच्या मानगुटीवर बसते आणि शकुन अपशकुन यासारख्या भोंगळ कल्पनांच्या आहारी जाऊन तो आपल्याच रक्ताच्या माणसांसाठी काळ ठरतो. पुरोगामी महाराष्ट्रात बेटी बचाव बेटी पढावच्या माध्यमातून महिलांच्या विकासाला चालना दिली जात असताना जळगावमध्ये एका इसमाने मुलगी जन्माला आल्यानंतर त्याच्या आईचे निधन झाले आणि त्याच्या मेडिकल दुकानाला आग लागल्यामुळे मुलीला अपशकुनी ठरवून तिचा इतका छळ केला कि तिला अन्न-पाण्यावाचून तडफडून मारायला भाग पडले. या प्रकरणी त्या दुर्दैवी मुलीच्या आईला आणि निष्ठुर बापाला पोलिसांनी अटक केली आहे.

जावेद अख्तर आणि नाजीया परवीन हे दाम्पत्य जळगाव शहरातील रजा नगर पिंप्राळा -हुडको परिसरात रहात होते. या दाम्पत्यास सन २००९ मधे पहिली मुलगी झाली. त्यांनी तिचे नाव कनीज असे ठेवले. पहिली मुलगी कनीज झाल्यानंतर काही दिवसातच जावेद अख्तर याच्या आईचे निधन झाले. त्यानंतर पुन्हा काही दिवसांनी जावेदच्या मेडीकल दुकानास आग लागली. सलग काही दिवसांच्या अंतराने घडलेल्या या ... पान २ वर

प्रेमाच्या जाळ्यात ओढून तिला नासवले खाकी वर्दीचे स्वप्न पाहणारीला फसवले

बुलढाणा/क्राईम रिपोर्टर

शारीरिक आकर्षण आणि त्यातून निर्माण झालेली जवळीक यातून शरीरसंबंध घडण्यास वेळ लागत नाही. प्रेमाच्या नावाखाली तरुण तरुणी जवळ येतात आणि मग जो तरुण असतो तो तिला लग्नाचे आमिष दाखवून कधी तिच्या संमतीने तर कधी जबरदस्तीने शरीरसुख घेतो. बुलढाण्यात राहणाऱ्या एका तरुणीच्या बाबतीत असेच घडले. पोलीस दलात भरती होण्यासाठी मैदानावर सरावाला जाणाऱ्या त्या तरुणीची तिथेच सरावाला येणाऱ्या एका लष्करी जवानांशी ओळख झाली आणि ओळखीचे रूपांतर प्रेमात झाले. यावेळी त्याने तिला लग्नाचे आमिष दाखवून तिच्या मनाविरुद्ध अनेक वेळा तिचा उपभोग घेतला. पण जेंव्हा तिला समजले कि त्याचा साखरपुडा दुसऱ्या मुलीशी झालाय तेंव्हा मात्र तिने त्याच्याविरुद्ध पोलिसांकडे धाव घेतली आणि तो लफंगा लग्नाच्या बेडीत अडकण्यापूर्वीच पोलिसांच्या बेडीत अडकला.

बावीस वर्षाची रेणूका दिसायला देखणी होती. चारचौघात तिचे तारुण्य आणी सौंदर्य खुलून दिसत असे. बुलढाणा शहरातील एकता नगर परिसरात राहणारी रेणूका कला शाखेच्या प्रथम ... पान २ वर

दारूच्या पार्टीत मित्रांनीच त्याचा घात केला पंढरपुरातील खून्याचा इचलकरंजीत गेम झाला

इचलकरंजी/क्राईम रिपोर्टर

कुठल्याही माणसाने एक गुन्हा पचवला कि त्याचा आत्मविश्वास वाढतो आणि त्यातून मग त्याच्या अंगी वेगळेच धाडस येते. या धाडसामुळे तो स्वतःला भाई समजू लागतो. आपण कोण आहोत आणि पूर्वी काय केले आहे हे सांगून समोरच्याला रुबाब दाखवण्याचा प्रयत्न करतो. पंढरपुरात खून करून इचलकरंजीत कामधंदा मिळवण्यासाठी नाव बदलून राहणाऱ्या किशोर भोसले याच्या बाबतीतही असेच झाले. त्याने आपल्या मित्रांसमोर आपण खून करून आलोय! आपल्या नादाला लागू नका, अशी फुशारकी मारली आणि तीच त्याच्या अंगाशी आली. कारण हा माणूस आपल्यासाठी पुढे घातक ठरू शकतो. आपल्याला वरचढ होऊ शकतो हे लक्षात येताच त्यांनी त्याला दारूच्या पार्टीला नेले आणि तिथेच त्याचा गेम केला.

आरोपी युवराज

आरोपी रोहित

सोमवार दि.३ मे २०२१ रोजी संध्याकाळी या भागातील नागरिक फेरफटका मारण्यासाठी बाहेर पडले असता. त्यांना देवमोरे याच्या विहिरीतून दुर्गंधी येत असल्याचे जाणविले काही जणांनी जवळ जाऊन पाहिले असता त्या विहिरीत एका तरूणाचा मृतदेह तरंगाताना दिसून आला. या घटनेची माहिती लोकांना समजातच त्यांनी घटनास्थळी गर्दी केली होती. पोलीस ही तातडीने आले. या घटनेचा स्थानिक गुन्हे शाखेचे स.पो.नि.विकास जाधव यांना या घटनेविषयी गुप्त माहितीगाराने माहिती दिली की, या अमराई रोडवरून शनिवार दि.१ मे रोजी एका मोटार सायकलीवरून संशयीत रित्या फिरत होते. त्या तिघांनी ही दारू प्राशन केली होती. ... पान २ वर

न्यायालयीन लढाई १४ वर्षांनी फळाला आली रुपालीच्या मारेकऱ्याला जन्मठेपेची शिक्षा झाली

मयत रुपाली

पुणे/राजेंद्र वेदांते

एखाद्या माणसाच्या मनात काय दडलेले असेल हे कधीच कुणी सांगू शकत नाही. त्यामुळे कधी कधी आपल्या सहवासात असलेला जवळचा माणूस सुद्धा आपल्यासाठी काळ बनू शकतो. पुण्यात ग्राफिक डिझाईनर असलेल्या एका विवाहितेवर तिला नेहमी कॅबमधून सोडणाऱ्या ड्रायव्हरची वाईट नजर होती. पण तिला हे ठाऊक नव्हते. त्यामुळे ती बेसावध होती आणि त्याचाच फायदा रेट्याने घेतला व एकेदिवशी तिला एकांत स्थळी नेवून तिच्यावर बलात्कार करून तिची हत्या केली. मात्र तो तिच्या विश्वासातील असल्याने त्याच्यावर कुणाचाही संशय नव्हता. मात्र पोलिसांनी त्याच्या हालचाली अचूक हेरून त्याला पकडले आणि पोलिसी खाक्या दाखवताच त्याने गुन्हा कबुल केला. त्यानंतर तब्बल १४ वर्षांच्या न्यायालयीन लढाईला यश येऊन न्यायालयाने त्याला जन्मठेपेची शिक्षा सुनावली.

वासना, क्रूरता जेंव्हा माणूसकीवर मात करते तेंव्हा घडू शकतो असा निर्दयी प्रकार २४ वर्षाच्या रूपाली ढमाले चव्हाण या विवाहितेचे अपहरण करून खून करण्यात आला होता. रूपालीची जेंव्हा हत्या करण्यात आली तेव्हा ती ५ महिन्याची गर्भवती होती. कोणाच्या अंगावर भितीने काटा येईल अशी हि घटना आहे. अखेर १४ वर्षांच्या प्रदीर्घ लढ्यानंतर आरोपीला आजन्म कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली आणि ढमाले या कुटुंबीयांना न्याय मिळाला या १४ वर्षाच्या प्रदीर्घ न्यायालयीन प्रक्रियेनंतर आता कुठे ढमाले कुटुंबीय मोकळा श्वास घेत आहेत. हि घटना पूण्याची असली तरी अंगावर काटा आणणारी आहे. ... पान २ वर

पान १ वरून....

आरोग्य यंत्रणेच्या निष्काळजीपणाला कधी...

मृतदेह घरच्यांना न देता परस्पर अंत्यविधी करण्याच्या नावाखाली त्या मृतदेहाचे अवयव काढून त्याचा धंदा करण्याचे किळसवाणे प्रकारही घडलेत. हा सगळा सावळा गोंधळ सरकारने अजूनही थांबवलेला नसल्याने रुग्णांना आणि त्यांच्या नातेवाईकांना त्यांच्या जिवंतपणी तर त्रास होताच आहे, पण मेल्यावर रुग्णालयांकडून त्रास दिला होतोय. वास्तविक कोरोनाचा हा संकट काळ सुरु असताना सरकार किंवा रुग्णालय प्रशासन यांनी अत्यंत काळजीपूर्वक आपली जबाबदारी पार पढायला हवी होती. पण आरोग्य खात्याचे लक्षच नसल्याने राज्यातील सरकारी आणि खाजगी रुग्णालयांसह कोविड सेंटरमध्येही अंदाधुंदी माजली आहे. त्याचा परिणाम असा झालाय कि लोक आता रुग्णालयात जायला तयार नाही. त्यामुळे खाजगी दवाखाने चालवणाऱ्यांची चांदी झाली आहे. म्हणूनच रुग्णालयांच्या कारभारावर आरोग्य विभागाने लक्ष ठेवण्याची गरज आहे. लातूरच्या वैद्यकीय महाविद्यालयातील मृतदेहांची अदलाबदल आणि त्यानंतर दफन करण्यात आलेला मृतदेह पुन्हा उकरून काढण्याची आलेली नामुष्की हि अत्यंत गंभीर आणि संतापजनक घटना आहे. गुरूवारी (ता.६) घडली आहे. शेळगाव येथील धोंडीराम तोंडारे (वय ६५) यांना मागील आठवड्यात कोरोना झाल्यामुळे त्यांच्यावर उदगीर येथे उपचार सुरू होते. मात्र प्रकृती चिंताजनक आसल्याने पुढील पचारासाठी त्यांना लातूर येथील कै. विलासराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. बुधवारी (ता.५) सायंकाळी त्यांचा मृत्यु झाल्यानंतर नातेवाईकांनी गुरूवारी सकाळी त्यांचा मृत्यदेह गावाकडे आणला व त्यांच्यावर शेतात अंत्यसंस्कार केले. याच दरम्यान हातोला (ता.अंबाजोगाई) येथील आबासाहेब सखाराम चव्हाण (वय ४५) यांचाही मृत्यु झालेला होता. वैदयकीय महाविद्यालयातील गलथान कारभारामुळे शेळगावच्या तोंडारे यांच्या नातेवाईकांकडे चव्हाण यांचा मृतदेह देण्यात आला, मृतदेहाची खात्री कोणीही केली नाही त्याच्यावर दफ विधीसंस्कार करण्यात आले. सकाळी चव्हाण यांचे नातेवाईक मृतदेह ताब्यात घेण्यासाठी वैद्यकीय महाविद्यालयात गेल्यानंतर त्यांनी मृतदेहाची ओळख केली असता संबधीत मृतदेह आबासाहेब चव्हाण यांचा नसल्याची बाब लक्षात आली. त्यानंतर वैद्यकीय महाविद्यालयातील प्रशासनाची एकच धावपळ सुरू झाली. आणी मृतदेहाची आदलाबदल झाल्याचे लक्षात आले. यानंतर तोंडार यांचा मृतदेह सोबत घेऊन शेळगाव येथे आले व त्यांनी तोंडारे यांच्या नातेवाईकांशी चर्चा करून चव्हाण यांचा पुरलेला मृतदेह काढून घेतला. यानंतर तोंडारे यांच्या मृत्यदेहावर अत्यंसंस्कार करण्यात आला.

केदारे बंधूनी डाव साधून घात केला...

पैठण जवळील गाढेगावचे माजी उपसरपंच कांताराव शिंदे हे रविवार दि.२ मे रोजी सकाळी कामानिमित्य आपल्या घरातून बाहेर पडले होते. रात्री उशिरापर्यत ते घरी परत न आल्याने त्याच्या घरच्या लोकांनी त्याच्या मोबाईलवर संपर्क साधला असता तो मोबाईल ही बंद लागत होता. त्याचा शोध त्याच्या घरचे लोक ही घेत होते. पण ते कुठेच मिळून येत नव्हते. अशातच सोमवार दि ३ मे रोजी सकाळी त्याचा मृतदेह त्याच्याच शेतवस्तीवरील घरापासून काही अंतरावर मिळून आला होता. त्याचे घर हे वाळूज एमआयडीसीच्या रोडवर होते. त्यांच्या अंगावर मारहाणीच्या खुणा दिसत होत्या. त्याच्या नाकातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव झालेला दिसून येत होता. त्याच्या अंगावर मारहाणीचे वळ दिसत होते. त्याच्या मृतदेहाजवळ एक लाकडी दांडा, कमरेच्या पट्टयाचे किल्प मिळून आले होते. या घटनेची माहिती मयत कांताराव शिंदे याचा मुलगा लखन शिंदे याने बिडकीन पोलीस स्टेशनला दिल्यावर पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले होते. पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पैठण येथील सरकारी रुग्णालयात पाठवून देण्यात आला. या घटनेची फिर्याद लखन शिंदे याने बिडकीन पोलीस स्टेशनला दिल्यावर पोलीस अधिक्षक मोक्षदा पाटील यांनी या घटनेचा रितसर तपास बिडकीन पोलीसाबरोबर स्थानिक गुन्हे अन्वेषणचे पोलीसांना ही करण्याचा आदेश दिला. कांताराव शिंदे याचा खून कुणी कोणत्या कारणातून केला याचा तपास पोलीस करीत असताना पोलीसांना माहिती मिळाली की, कांताराव शिंदे याचे मागील काही महिन्यापूर्वी अनिल उर्फ पप्पु अशोक केदारे याचे बरोबर शेतजमीनीच्या वादातून भांडण झाले होते. कांताराव शिंदे हे गाढेगावचे माजी उपसरंपच असल्याने त्याच्या शब्दाला किंमत होती. गावातील कोणताही वाद ते पुढे होऊन मिटवत होते. परंतू त्याच्याच शेतजमीनी शेजारी असणारे केदारे याच्याबरोबर असणारा वाद ते मिटवू शकले नव्हते. त्याचा आणि केदारे याच्या शेतजमिनीचा वाद हा गेल्या काही वर्षापासून सुरू होता. बऱ्याचवेळेला या कारणातून त्याचा आणि केदारे बंधू याच्यात मारामारी आणि भांडणे ही झाली होती. पोलीस स्टेशनच्या पायऱ्या ही चढल्या होत्या. परंतू वाद हा मिटला नव्हता. हा वाद तसा मोठा ही नव्हता. कांताराव शिंदे याच्या शेतातून केदारी हे नेहमी वहिवाट करीत होते. खरे तर केदारी बंधू यांना त्याच्या शेतात जायला दुसरीकडून ही पायवाट होती. परंतू ते मुद्दामच कांताराव शिंदे याच्या शेतातून जात येत होते. त्यामुळे केदारी बंधू यांना कांताराव शिंदे यांनी बऱ्याच वेळेला समज दिली होती की आपल्या शेतातून पायवाट करू नका पायवाटची वहिवाट करून नका. तरीही केदारे बंधू हे काही ऐकत नव्हते. त्याचा हा वाद अलिकडच्या दिवसात विकोपाला गेला होता. कुणी ही माघार घ्यायला तयार नव्हते. त्यातच गेल्या महिन्यात कांताराव शिंदे यांनी अनिल केदारे संजय केदारे आणि राजेश केदारे यांच्याबरोबर वाद उकरून काढून अनिल याला माहराण केली होती. याचा राग अनिल केदारे याना आला होता. ते कांताराव शिंदे याचा कायमचा बंदोबस्त करू इच्छित होते. कारण कांताराव शिंदे हे गाढेगावचे माची उपसरपंच असल्याने ते कुणाचेच काही ऐकत नाहीत आपले तेच म्हणणे खरे करतात आणि गावातील काही लोक हे कांताराव याच्या बाजूनेच बोलत असतात. त्यामुळे आपले कुणीच काही ऐकत नाही. हा राग अनिल केदारे याच्या मनातून होता. त्याचा बदला घ्यायचाच असे त्याने मनातून ठरवून आपले चलुत भाऊ संजय केदारे आणि राजेश केदारे यांना कांताराव शिंदे याचा कायमचा बंदोबस्त केला पाहिजे नाही तर तो आपल्याला डोईजड होत आहे. त्याला आताच अद्दल घडविली पाहिजे असे त्या दोघांच्या मनात भरविले. ते ही कांताराव शिंदे याचा गेम करायला अनिल केदारे याला तयार झाले. त्यासाठी त्यांनी तसा प्लॅन केला. रविवार दि.२ मे रोजी कांताराव शिंदे हे कामानिमित्य घराबाहेर पडले होते. रात्री ८ वाजणेच्या सुमारास त्यावेळी अनिल केदारे, संजय केदारे आणि राजेश केदारे यांनी कांताराव शिंदे याना घेरून त्याना जबरदस्तीने आपल्या गाडीत बसविले आणि म्हसोबा पुलाजवळ आणून त्या तिघांनी त्यांना कमरेच्या बेल्टने आणि लाकडाच्या दांडक्याने मारहाण केली. ते तिघे त्याना जबर मारहाण करीत होते. त्या मारहाणीत कांताराव शिंदे हे घायाळ झाले होते. त्याच्या नाका तोंडातून मोठ्या प्रमाणात रक्त येत होते. तसेच लाकडी दांडक्याने मारहाण केल्याने डोक्यातून ही रक्तस्त्राव मोठया प्रमाणात झाला. त्या मारहाणीत त्यांचा जागीच मृत्यू झाल्याचे लक्षात येताच केदारे बंधू यांनी त्यांना परत त्याच गाडीतून त्याच्या वाळूज एमआडीसीरोडवरील त्याच्या शेतवस्तीजवळ त्याचा मृतदेह टाकून त्यांनी तेथून पोबरा केला. इकडे कांताराव शिंदे हे रविवारी सकाळी कामानिमित्य घराच्या बाहेर गेले होते. ते परत रात्री उशिरा पर्यत घरी न आल्याने त्याच्या घरच्या लोकांनी त्याच्या मोबाईलवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्याचा मोबाईल फोन ही बंद लागत होता. त्याची वाट बघून रात्री त्याचे घरचे लोक तसेच झोपी गेले. दुसऱ्या दिवशी म्हणजे सोमवार दि.३ मे रोजी त्याचा मुलगा लखन शिंदे हा आपल्या वडिलांच्या शोधार्थ बाहेर पडला असता त्याला आपल्या वडिलांचा मृतदेह घराशेजारी असणाऱ्या शेतात आढळून आला. त्याने या घटनेची माहिती बिडकीन पोलिसांना दिल्यावर पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले होते. त्याने दिलेल्या फिर्यादीत अनिल उर्फ पप्पु अशोक केदारे, संजय मनाहेर केदारे आणि राजेश प्रभाकर केदारे याची संशयीत म्हणून नावे दिली होती. घटनेनंतर हे तिघे ही पळून गेले होते. पोलीस त्याचा शोध घेत होते. त्याच्या मोबाईल कॉलचे लोकेशन तपासण्यात येत होते. घटनेनंतर अवघ्या २४ तासात पोलिसांनी या तिघांना ताब्यात घेतले होते. त्यांना पोलीस स्टेशनला आणून त्याच्याकडे कांताराव शिंदे याच्या हत्येविषयी चौकशी करायला सुरूवात केली असता ते तिघे ही पोलिसांना उडवाउडवीचे उतरे देत होते. पोलिसांनी त्यांना आपला पोलीसी खाक्या दाखविताच त्यांनी आपला गुन्हा कबुल करून तो का आणि कशासाठी केला याची माहिती दिली. लखन शिंदे याच्या फिर्यादीवरून बिडकीन पोलीस ठाण्यात कांताराव श्रीपती शिंदे (वय ४८) याच्या खून प्रकरणी अनिल पप्पू केदारे (वय २१) संजय मनाहेर केदारे (वय २६) आणि राजेश प्रभाकर केदारे (वय २३) रा.तिघे ही गाढेगाव पैठण यांच्या विरोधात भादंवी कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याना मा.कोर्टासमोर उभे केले असता. मा.कोर्टाने त्यांना तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेली गाडी, बेल्ट आणि लाकडी दांडका जप्त केला. या घटनेचा तपास पोलीस निरीक्षक भागवत फुंदे, पोलीस उपनिरीक्षक संदीप सोळंके, गणेश राऊत, पो.हेड कॉ.प्रमोद खांडेभराड, किरण गोरे, विक्रम देशमुख, श्रीमंत भालेराव, धिरज जाधव, पो.ना.नरेंद्र खंदारे, संजय भोसले, वाल्मिक निकम, उमेश बकले, ज्ञानेश्वर मेटे, योगेश तरमाळे, संतोष डमाळे यांनी करून संशयीत आरोपीना ताब्यात घेतले होते.

अरेच्च्या सासूचा लागला जावयाला...

म्हणजे बेळगाव येथे जात होती. असिफ याची सासू अनारकली तेरणे ही त्या दोघांना समजावून सांगत होती. परंतु काही केल्या त्या दोघा नवरा बायकोचे भांडण मिटत नव्हते. याला कारण ही तसेच होते. असिफ आणि आपली आई अनारकली याच्यात काही तरी वेगळेच शिजत आहे याची शंका असिफ याच्या पत्नीला येत होती. म्हणून ती त्या दोघांच्याबरोबर भांडण काढत होती. त्या दोघांचे लफडे सुरू असल्याचा संशय तिला होता. असिफची नजर बायको पेक्षा आपल्या सासूवरच जास्त असायची तो तिच्या शेजारी बसून गुलगुलू बोलत होता. पत्नीविषयी भलते सलते तिला सांगत होता. ती ही जावाई माझा भला म्हणून त्याच्याशी जवळीक साधत होती. यातूनच त्या दोघांच्यात विवाहबाहय अनैतिकसंबंध सुरू झाले होते. असिफ आतार हा अनारकलीलाच आपली बायको मानत होता. वास्तविक खरे तर त्या दोघांच्या वयात निम्यापेक्षा जास्त अंतर होते. तो २६ वर्षाचा होता. तर तिने वयाची ४५शी पार केलेली होती. तो तिलाच आपली बायको मानत होता. सासू जावायच्या त्या संबंधाची समाजात आणि नातेवाईकात चर्चा होऊ लागल्याने त्या दोघांची बदनामी होऊ लागली. म्हणून असिफ याने यातून मार्ग काढण्यासाठी पुणे बिबवेवाडी येथील शेळके वस्तीत राहत असलेला असिफ मंजालपुरे याच्याकडे आला होता. असिफ मंजलापुरे हा असिफ दस्तगीर याच्या मामाचा मुलगा होता. गेल्या आठ ते नऊ महिन्यापूर्वी तो असिफ मंजलापुरे याच्याकडे येऊन त्याने त्याला आपली कर्म कहाणी सांगितली होती. असिफ याने मंजलापुरे याला सांगितले की त्याचे व त्याच्या बायकोची सारखी भांडणे होत आहेत. म्हणून तो आता पुण्याला कामाच्या शोधात आला आहे. असिफची कहाणी ऐकून मंजलापुरे याने असिफ याला पुण्यात एके ठिकाणीकाम मिळवून दिले. खरे तर तो पुण्यात आला त्यावेळी त्याने येताना आपली सासू अनारकली हिला ही पळवून आणले होते. मंजलापुरे याने असिफ दस्तगीर याला सासु विषयी विचारले असता असिफ याने मंजलापुरे याला सांगितले की आता अनारकली हिच माझी बायको आहे. म्हणून मी तिला माझ्याबरोबर आणले आहे. आमच्या दोघांचे ते संबंध आहेत. अनारकलीची दुसरी मुलगी सोनिया ही आमच्या बरोबर आहे. त्यावेळी मंजलापुरे याने त्याना काही बोलले नाही. त्याच्या लक्षात ही सगळी गोष्ट आलेली होती. आता गेल्या आठ नऊ महिन्यापासून अनाकरली आणि असिफ दस्तगीर हे दोघे ही बिबवेवाडीतील शेळके वस्तीतील मंजलापूरे याच्या ओळखीने भाडयाच्या घरात राहू लागले होते. ते दोघे ही आता नवरा बायको सारखे राहत असल्याने त्याच्या नात्याविषयी कधीच कुणाला कसली शंका आली नाही. कारण अनारकली आणि असिफ याच्या वयातील अंतर हे बरेच होते. शिवाय सोनिया ही त्याच्याबरोबर राहत असल्याने लोकांना असिफची सोनिया ही बायकोच वाटत होती. परंतू असिफ हा अनारकली बरोबर झोपून मजा मारत दिवस ढकलत होता. काम मिळेल त्यावेळी कामाला जात होता. नाही काम मिळाले तर घरातच झोपत होता. त्यातच कोरोनाचा पादुर्भाव वाढल्याने त्याला काम मिळणे ही बंद झाले. तो घरात घरखर्चाला काही पैसे देत नव्हता, त्यामुळे अनारकलीची पंचायत झाली होती. एक तर ती त्या संबंधातून जावायाबरोबर पळून पुण्याला आली होती. त्यामुळे आधीच समाजात आणि नातेवाईकात त्याची अब्रु गेलेली होती. त्या दोघांना ही तोंड दाखवायला जागा नव्हती. अशातच बेळगावला परत जाणे म्हणजे स्वता:च्या पायावर कुऱ्हाड मारून घेतल्यासारखे तिला होते. त्यातच आता ती जावाई असिफबरोबर भांडण काढून मला व माझ्या मुलीला फसविले दोघींना नादाला लावून दोघीच्याबरोबर मजा मारलीस आणि आता घरखर्चाला नीट पैसे देत नाहीस तू आम्हाला येथे आणून उपाशी ठेवत आहेस म्हणून भांडण काढत होती. त्या दोघांची भांडणे दिवसे दिवस विकोपाला गेली होती. असिफ ही अलिकडे दारू पिऊन येऊन सासू अनारकली हिला तुला जेवण नीट करता येत नाही म्हणून उलट वाद घालत तिलाच मारहाण करीत होता. तिच्या नशिबी नवऱ्याच्या ऐवजी जावायाकडून मार खाणे आले होते. ती त्याच्या भांडणाला वैतागलेली होती. दि.३० एप्रिल २०२१ ला रात्री त्या दोघांत याच कारणातून जोरदार भांडण झाले होते. या भांडणात असिफ याने सासू अनारकली हिला मारहाण केली होती. त्यानंतर तो घरातून निघून गेला होता. दुसऱ्या दिवशी म्हणजे १ मे २०२१ रोजी तो सकाळी ९ वाजणेच्या सुमारास घरी परत आल्यावर अनारकली आणि त्याच्यात पुन्हा याच कारणातून भांडणाला सुरूवात झाली. त्यावेळी असिफ हा तिच्यावर चिडला होता. त्याला तिचा राग येत होता. त्या भांडणात त्याने तिला मारहाण करीत खाली पाडले आणि रागाच्या भरात तिच्याच गळ्यातील ओढणीने तिचा गळा आवळला. तशी ती जागीच निपचिप पडली. तिचा जागीच मृत्यू झाला होता. ही गोष्ट असिफच्या लक्षात आल्यावर त्याने घराला कडी लावून बाहेर गेला आणि नातेवाईक असणारा असिफ मंजलापूरे याला घडलेली सगळी घटना सांगून आपल्या हातून सासू अनारकलीचा खून झाल्याचे सांगितले. त्यावेळी असिफ मंजलापूरे याने घटनास्थळी जावून पाहिले असता घटनास्थळी अनारकली तेरणे या निपचिप पडल्या होत्या. त्याच्या गळ्याभोवती ओढणी आवळ्याचे व्रण दिसत होते. फास लावलेल्या अवस्थेत ओढणी तशीच होती. असिफ मंजलापूरे याने घटनेची माहिती लगेच बिबवेवाडी पोलिसांना सांगितली. पोलिसांनी लगेच घटनास्थळी धाव घेऊन घटनेची पाहणी करून घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. या घटनेची फिर्याद असिफ मंजलापुरे याच्याकडून घेऊन पोलीस या घटनेतील संशयीत फरारी आरोपी असिफ आतार याचा शोध घेत असताना तो काही वेळातच पोलिसांना मिळुन आला.

पोलीसांनी त्याला ताब्यात घेऊन बिबवेवाडी पोलीस स्टेशनला आणून त्याच्याकडे या घटनेची चौकशी केली असता. त्याने तिचा रागाच्या भरात तिच्याच ओढणीने गळा आवळून खून केला अशी कबुली त्याने पोलीसासमोर दिली. असिफ मंजलापुरे याच्या फिर्यादीवरून पोलीसांनी अनारकली मंहमंद तेरणे (वय ४५) हिच्या खून प्रकरणी तिचा जावई असिफ दस्तगीर आतार (वय २६) याच्या विरोधात भा.दं.वी.कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला मा.कोर्टासमोर उभे केले असता. मा.कोर्टाने त्याला तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली होती. या घटनेचा पुढील तपास स.पो.नी.राजेश उसगावकर हे करीत आहेत.

मुलगी झाली पण अपशकुनी ...

दुर्दैवी घटनामुळे जावेद हताश झाला. आपल्या घरात जन्माला आलेली कनीज ही आपल्यासाठी अपशकुनी असल्याचा त्याने मनाशी गैरसमज करुन घेतला. हळूहळू त्याच्या मनातील हा गैरसमज दृढ होत गेला. त्याच्या मनातून या बालिकेबद्दल निर्माण झालेला गैरसमज जाण्याचे काही केल्या नाव घेत नव्हता. मनात आलेला गैरसमज त्याच्या मनात कायमचे वास्तव्य करुन बसला. आपली पोटची मुलगी अपशकुनी असल्याच्या गैरसमजातून त्याने तिला त्रास देण्याचे काम सुरु केले. निष्पाप कनीजने या जगाची साधी तोंडओळख देखील केली नव्हती. मात्र ती आपल्या बापाच्या दृष्टीने अपशकुनी ठरली होती. तिचा काहीही दोष नसतांना ती आपल्या जन्मदात्या बापाच्या दृष्टीने अपशकुनी ठरली होती. तिच्या आजीचे अर्थात जावेदच्या आईचे निधन हे विधीलिखीत होते. झालेले वय आणि हृदयविकाराच्या झटक्याने जावेदच्या आईचे निधन झाले होते. तसेच जावेद अख्तर याच्या मेडीकल दुकानाला लागलेल्या आगीचा आणि तिच्या जन्माचा देखील तसा कोणताही संबंध नव्हता. तरीदेखील ती आपल्या बापाच्या दृष्टीने अपशकुनी ठरली होती हे तिचे दुर्दैव होते. सन २००९ मधे जन्माला आलेल्या कनीजचा जन्मदात्या बापाकडून मानसिक व शारिरीक छळ होत असल्याचे बघून तिचा मामा अजहर अली शौकत अली यास राहवले गेले नाही. त्याने भाची कनीजला आपल्या गावी अमळनेर येथे सोबत आणले. मामा अजहर अली यास भाची कनीजची दया आली होती. त्यामुळेच बापाच्या छळातून त्याने तिची सुटका केली. बापाचे नेहमी नेहमी रागावणे, मारहाण करणे, तिला जड वस्तू फेकून मारणे या गोष्टीपासून तिची सुटका झाली होती. त्यामुळे तिला मामा अहजरचा लळा लागला होता. मामा अजहर यानेच तिच्या शिक्षणाची जबाबदारी स्विकारली. अमळनेर येथील शाळेत त्याने तिचे नाव दाखल केले. ती मामाच्या घरकामात मदत करु लागली. अशा प्रकारे बालिका कनीज ही मामाच्या घरी लवकरच रुळली. बघता बघता दहा वर्षाचा कालावधी उलटला. कनीज आता सुमारे दहा वर्षाची झाली होती. या दहा वर्षाच्या कालावधीत देखील बाप जावेद याच्या मनातून मुलगी कनीजबद्दल राग कायम होता. तो आजही तिला अपशकुनी अर्थात मनहूस समजत होता. दहा वर्षाचा कालावधी लोटल्यानंतर जावेदने कनीजचा मामा अर्थात त्याचा शालक अजहर सोबत भांडण सुरु केले. माझी मुलगी तु का नेली. तिला आमच्या ताब्यात दे असे म्हणत जावेदने शालक अजहरसोबत वाद घालण्यास सुरुवात केली. हा वाद जवळच्या नातेवाईकांपर्यत गेला. समाजातील चार प्रतिष्ठीत नातेवाईकांना बोलावून त्यांच्या कानावर हा विषय घालून मार्ग काढण्याचा अजहर याने प्रयत्न केला. अखेर चार प्रतिष्ठीत नातेवाईकांच्या समक्ष व त्यांच्या माध्यमातून कनीजला कुठलाही त्रास दिला जाणार नाही असे जावेदकडून वदवुन घेण्यात आले. अटी शर्थीवर कनीजला जावेदच्या ताब्यात देण्यात आले. एवढे वर्ष सोबत राहिलेली भाची बापाच्या ताब्यात जात असल्याचे बघून तिचा मामा अजहर यास गहिवरुन आले होते. कनीजला देखील मामाचे घर सोडून जाण्याची मुळीच इच्छा नव्हती. मात्र बापाच्या हेकेखोरपणापुढे तिचे व कुणाचेच काही चालले नाही. आता कनीज ही बाप जावेद व आई नाजीया यांच्या ताब्यात आली होती. मुलगी कनीज आपल्या ताब्यात आल्यापासून जावेद व नाजीया या दाम्पत्याने अजहर सोबत जणू काही नातेसंबंध तोडून टाकले. आता मात्र या नराधम बापाने कनीजला अमानवी पद्धतीने अतिशय क्रूर वागणूक देण्यास सुरुवात केली. हा बाप नसून हैवान असल्याचे निष्पाप कनीजला दिसून आले. ती दहा वर्षाची बालिका हतबल होती. जावेदने त्याच्या पत्नीला सक्त ताकीद दिली की कनीजला अतिशय कमी प्रमाणात खायला द्यायचे. तिला उपाशी ठेवल्यानंतर ती आपोआप मरुन जाईल असे त्याने पत्नी नाजीयाला म्हटले. नराधम बाप जावेदने कनीजला एका खोलीत डांबून ठेवले. तिचे खेळण्याबागडण्याचे वय असतांना तिला एका खोलीत डांबून नजरकैदेत ठेवण्यात आले. तिला खायला जवळपास दिलेच जात नव्हते. पिण्यास पाणी वेळेवर दिले जात नव्हते. तिला अंघोळ करु दिली जात नव्हती. तसेच तिच्या केसांना लावण्यास तेल दिले जात नव्हते. त्यामुळे तिचे घनदाट केस रुक्ष होण्यास सुरुवात झाली होती. तिच्या केसांमधे लवकरच उवा, खवले आणी कोंडा निर्माण होण्यास सुरुवात झाली. खायला अन्न व पिण्यास पाणी मिळत नसल्यामुळे तिची प्रकृती खालावण्यास सुरुवात झाली. ती दिवसेंदिवस कुपोषीत होऊ लागली. खिडकीतून ती आपल्या वयाच्या मुला मुलींना खेळत असल्याचे बघत असे. मात्र इच्छा असून देखील ती बाहेर खेळण्यास जाऊ शकत नव्हती. ती एका खोलीत बंदीस्त होती. तिला बाहेर जाण्यास सक्त मनाई करण्यात आली होती. तिचा कुणाशी संपर्क देखील येऊ दिला जात नव्हता. वेळप्रसंगी जावेद पोटची मुलगी कनीजला बेदम मारहाण करु लागला. एके दिवशी त्याने अवजड कुकर तिच्या पाठीत मारुन फेकला. त्यामुळे आधीच कुपोषीत बालिका कनीज जखमी झाली व जमीनीवर धाडकन कोसळली. तिला वैद्यकीय उपचारापासून मुद्दाम वंचीत ठेवण्यात आले. ज्या दिवशी तिच्या पाठीत अवजड कुकर जावेदने मारुन फेकला तो दिवस इद ए मिलादचा दिवस होता. या चांगल्या दिवशी देखील जावेदच्या मनात आणि अंगात सैतानी रुप आले होते. बालिका आपली असो वा इतर कुणाचीही असो एवढे नराधमपणे कुणीही वागत नाही हे जावेदला समजत नव्हते. परक्याची बालिका जवळ आली म्हणजे तिला आपुलकीने खायला, प्यायला दिले जाते. एवढा साधा आणी सरळ विचारदेखील जावेदच्या मनात येत नव्हता. पाठीवर कुकर मारुन फेकल्यामुळे झालेल्या दुखापतीमुळे तिला सरळ उभे राहणे अवघड झाले होते. ती घसरत घसरतच हाताच्या मदतीने चालत होती. तिला बाहेर जाण्या येण्यास बंदी असल्यामुळे तीला खोलीतच नाईलाजाने प्रातर्विधी करण्याची वेळ आली होती. एवढा अमानवी व्यवहार तिच्यासोबत करतांना बाप असलेल्या जावेदचे मन जराही द्रवले नव्हते. एवढे कमी झाले म्हणून की काय तो तिला लाथाबुक्क्यांनी मारहाण करत असे. आपण हिला खायला द्यायचे नाही म्हणजे ही आपोआपच मरुन जाईल असे त्याने पत्नी नाजीयाला बजावून ठेवले होते. आपल्या भाचीवर होत असलेला अन्याय अजहर यास बहिण नाजीयाकडून समजला होता. बहिण नाजीयाकडून समजलेल्या या अमानवी घटनेमुळे कनीज फातेमा शेख जावेद हिच्या मामाला गहिवरुन आले. अखेर ती काळरात्र आली. खाण्यास अन्न नाही व पिण्यास पाणी नाही व कित्येक दिवसांपासून अघोळ देखील नाही व त्यामुळे कनीजने आपले प्राण त्यागले. २३ एप्रिलच्या रात्री नऊ वाजता तिचा मृत्यू झाला. मनहुस अर्थात अपशकुनी म्हणून अनन्वीत छळ करण्यात आलेल्या कनीज य दहा ते अकरा वर्षाच्या बालिकेने आपला जिव सोडून मृत्युला कवटाळले होते. आपली मुलगी मरण पावल्याचे समजल्यावर देखील नराधम बाप जावेदला दुख: झाले नाही. दुसऱ्याच दिवशी २४ एप्रिल रोजी सकाळी त्याने कुणाला न कळवता तिच्या मृतदेहाचा दफनविधी भराभर आटोपून घेतला. या संशयास्पद मृत्यूची माहिती मयत कनीजचा मामा अजहर यास उशीरा समजली. अजहर अली शौकत अली याने २७ एप्रिल रोजी रामानंद नगर पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक अनिल बडगुजर यांची भेट घेत लेखी स्वरुपात माहिती देत आपली कैफीयत मांडली. आपल्या मयत भाचीला न्याय मिळावा आणी तिच्या नराधम माता पित्याला शासन व्हावे अशी विनंती अजहर अली याने पो.नि.बडगुजर यांना केली. या गंभीर घटनेची पो.नि. अनिल बडगुजर यांनी तातडीने दखल घेत वेगवान हालचाली सुरु केल्या. या घटनेची माहिती पो.नि.अनिल बडगुजर यांनी पोलिस अधिक्षक डॉ. प्रविण मुंढे यांच्यासह अप्पर पोलिस अधिक्षक चंद्रकांत गवळी तसेच सहायक पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांच्या कानावर घातली. सर्व बड्या अधिकाऱ्यांसह पो.नि. अनिल बडगुजर यांनी दफनविधी झालेल्या घटनास्थळाला भेट दिली. या प्रकरणी सर्व प्रथम अकस्मात मृत्यूची नोंद घेण्यात आली. सदर अकस्मात मृत्यु २५/२१ या क्रमांकाने सीआरपीसी १७४ नुसार स.पो.नि. दिपक बिरारी यांनी वरिष्ठांच्या आदेशाने दाखल केला. सदर अकस्मात मृत्यूचा तपास स.पो.नि. दिपक बिरारी यांनी सुरु केला. मयत कनीज ज्या खोलीत मरण पावली त्या खोलीचा तसेच तिला ज्या ठिकाणी कब्रस्थानात दफन करण्यात आले त्या दोन्ही जागेचा पंचनामा करण्यात आला. सहायक पोलिस अधिक्षक कुमार चिंता, पो.नि. अनिल बडगुजर, नायब तहसीलदार प्रदीप राजपूत, जिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. वैभव सोनार तसेच रामानंद नगर पोलिस स्टेशनचे स.पो.नि. दिपक बिरारी, गोपनीय शाखेचे तपास पथक, मयत कनीजचे मामा आर्दीनी दफनविधी झालेले घटनास्थळ गाठले. मयत कनीजचे पुरलेले शव खोदून बाहेर काढण्यात आले. त्या मृतदेहाचा सर्वांसमक्ष पंचनामा करण्यात आला. उत्तरीय तपासणीकामी तिचे शव सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. उत्तरीय तपासणीत अकरा वर्षांच्या मयत कनीजचे वजन कुपोषनामुळे अवघे नऊ किलो भरले. तिचा व्हिसेरा नाशिक येथे न्यायवैद्यक प्रयोगशाळेत रवाना करण्यात आला. तो राखीव ठेवण्यात आला आहे. सर्व प्रकारच्या तपासणी व चौकशीअंती मयत कनीजच्या मृत्यूप्रकरणी तिचा नराधम बाप जावेद अख्तर शेख जमालउद्दीन व आई महिला परवीन बी शेख रफीक (दोघे रा. रजा नगर पिंप्राळा हुडको - जळगाव) यांच्याविरुद्ध रामानंद नगर पोलिस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला. सरकारतर्फे फिर्यादी होत स.पो.नि. दिपक बिरारी यांनी सदर गुन्हा भाग ५ गु.र.न. ११८/२१ भा.द.वि.कलम ३०४, ३२३, ५०६, २०१, २०२, ३४, बाल-न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधीनियम,२०१५ चे कलम ७५ नुसार दाखल करण्यात आला. तपासी अंमलदार विनोद सोनवणे यांनी सदर गुन्हा दाखल करुन घेतला. मयत कनीजचा नराधम बाप जावेद अख्तर व आई नाजीया परवीन या दोघांना अटक करण्यात आली. दोघांना न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने सुरुवातीला दोघांना पोलिस कोठडी सुनावली. पोलिस कोठडी दरम्यान दोघांनी आपला गुन्हा कबुल केला. मयत कनीज ही अपशकुनी असल्याचा समज करुन घेत फेब्रुवारी २०१९ पासून २३ एप्रिल २०२१ पावेतो जवळपास दोन वर्षापासून खुद्द जन्मदात्या बापाने मयत कनीजला एका खोलीत डांबून ठेवले होते. तिला खाण्यापिण्यास अतिशय कमी प्रमाणात दिले जात होते. तिला वेळोवेळी दमदाटी व मारहाण केली जात होती. तिला गरजेपेक्षा खुप कमी प्रमाणात जेवण दिल्यामुळे तिची प्रकृती दिवसेंदिवस खालावली होती. ती मरणासन्न अवस्थेत जगत होती. एवढे कमी झाले म्हणून की काय तिला वेळोवेळी शारीरीक व मानसिक यातना देखील दिल्या जात होत्या. तिच्यावर वेळीच औषधोपचार केला जात नव्हता. तिला कुपोषीत करण्यात आले होते. मरणासन्न अवस्थेत ती एका खोलीत दिवस कंठत असतांना अखेर तिने आपला जिव सोडला. या गुन्ह्याच्या तपासकामी पो.नि. अनिल बडगुजर यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नि. दिपक बिरारी, भुषण पाटील, पोलिस नाईक जितेंद्र तावडे, रेवानंद साळुंखे, अतुल चौधरी, डी.बी. पथकातील विजय खैरे, सुशील चौधरी, रविंद्र पाटील, उमेश पवार, शिवाजी धुमाळ, गोपाल चौधरी, संतोष गिते, अतुल पवार, प्रविण वाघ, हर्षल पाटील, राकेश दुसाने, महिला पोलिस सुवर्णा तायडे, सुलताना सैय्यद, दिव्या छाडेकर, रत्ना मराठे, वळवी आदींनी तपासकामात सहभाग घेतला. पुढील तपास सुरु आहे.

प्रेमाच्या जाळ्यात ओढून तिला नासवले...

वर्गात शिक्षण घेत होती. तिला पोलिस होण्याची इच्छा होती. पोलिस दलात दाखल होण्याच्या दृष्टीने ती मैदानावर जाऊन सराव करत होती. शहरातील जिजामाता महाविद्यालयाच्या भव्य पटांगणावर ती मैदानी सराव करण्यासाठी जात होती. त्या मैदानावर सैन्यात दाखल असलेला एक जवान देखील रनींग करण्यासाठी येत होता. त्या जवानासो

10 TO 16 MAY 2021 - Page 3 (CRIME SANDHYA):Layout 1 08/05/2021 6:42 PM Page 1

जळगावमध्ये पुतण्यानेच टाकला काकांच्या घरावर दरोडा

जळगाव/प्रतिनिधी

काकांच्या घरात नेहमी ३० ते ४० लाख रुपये असतात व त्या रकमेची लुट केली तर आपली आर्थिक चणचण दुर होईल व चांगला लाभ होईल या कुविचारातून टाकण्यात आलेल्या दरोड्यातील पाच आरोपी स्थानिक गुन्हे शाखेने निष्पन्न केले. यातील मुख्य सुत्रधार आरोपी हा सनी इंदरकुमार साहित्या रा. सिंधी कॉलनी हा असल्याचे निष्पन्न झाले आहे. सर्व संशयीत आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिस पथकाने ताब्यात घेत त्यांना अटक केली आहे.

सिंधी कॉलनी परिसरातील रहिवासी सनी इंदरकुमार साहित्या याचे काका प्रकाश साहित्या आहेत. काकांच्या घरात नेहमी लाखो रुपये असल्याचा सनी साहित्या याचा समज झाला होता. त्यामुळे त्याने आपले साथीदार राकेश शिवाजी सोनवणे (३५) रा.देवपुर धुळे, उमेश सुरेश बारी (२५) रा.चर्चच्या मागे जळगाव, मयुर अशोक सोनार (३५) रा.जळगाव व नरेंद्र उर्फ योगेश अशोक सोनार (३४) रा.जामनेर यांच्या मदतीने लुटीचा कट रचला होता. त्या कटानुसार सर्व प्रकारचे नियोजन करण्यात आले होते. त्यात लुट करायच्या काकांच्या घराची व घराकडे जाणाऱ्या व येणाऱ्या रस्त्यांची इत्यंभुत माहिती व रंगीत तालीम करण्यात आली होती.

त्यानुसार १७ मार्च रोजी सायंकाळी साडेसात वाजेच्या सुमारास सुत्रधार सनी साहित्या याच्या अख्त्यारीखाली इतर सर्व आरोपींनी स्कॉर्पिओ गाडीने येऊन काका प्रकाश साहित्या यांच्या घरात अनाधिकारे प्रवेश केला. घरातील सदस्यांना पिस्तुलचा धाक दाखवत घरातील सोने व रकमेची मागणी करण्यात आली होती. घरातील सर्व कपाट आलेल्या आरोपींनी उघडून पाहिले. मात्र त्यांच्या हाती काहीच लागले नाही. त्यामुळे आलेले सर्व जण रिकाम्या हातांनी दरवाज्याला कडी लाऊन निघून गेले होते. या घटने प्रकरणी आरोपींचे वर्णन लक्षात घेत वंशिका प्रकाश साहित्या (३५) रा.प्लॅट नं. १ पहीला मजला, स्वामी टॉवर,ईच्छा देवी चौक, सेवा मंडल यांनी जिल्हापेठ पोलिस स्टेशनला फिर्याद दाखल केली होती. सदर गुन्हा भाग ५ गु.र.न. ९४/२१ भा.द.वि. ३९३ नुसार दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे व्यापारी वर्गात दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते. गुन्ह्याच्या तपासकामी स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. किरणकुमार बकाले यांच्या मार्गदर्शनाखाली तपास यंत्रणा कामाला लागली होती. सर्व प्रकारचे पुरावे, सीसीटीव्ही फुटेज व खबऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे तपास पुढे पुढे सरकत होता. अखेर या गुन्ह्याप्रकरणी नात्यातील मुख्य सुत्रधार सनी इंदरकुमार साहीत्या याचा व त्याच्या साथीदारांचा सहभाग निष्पन्न झाला. त्याच्यासह राकेश शिवाजी सोनवणे, उमेश सुरेश बारी, मयुर अशोक सोनार, नरेंद्र उर्फ योगेश अशोक सोनार यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांनी आपला गुन्हा कबुल केला. पोलिस अधिक्षक डॉ.प्रविण मुंढे, अप्पर पोलीस अधीक्षक चंद्रकांत गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार बकाले व त्यांचे सहकारी स.पो.नि. स्वप्निल नाईक, सहायक फौजदार अशोक महाजन, विजय पाटील, विजयसिंग पाटील, सुधाकर अंभोरे, जितेंद्र पाटील, सुनिल दामोदरे, नरेंद्र वारुळे, राहुल पाटील,नितीन बाविस्कर, प्रितम पाटील, दिनेश बडगुजर, श्रीकृष्ण पटवर्धन, संदीप सावळे, प्रदीप पाटील, जयंत चौधरी, भगवान पाटील,नंदलाल पाटील, किरण धनगर, प्रमोद लाडवंजारी, मुरलीधर बारी, दर्शन ढाकणे यांनी तपासकामी सहभाग घेतला.

सोन्याच्या नकली नाण्यांचे आमीष देऊन फसवणूक करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश!

खामगाव/प्रतिनिधी

सोन्याची नाणी कमी किंमतीत देण्याचे आमिष दाखवत नकली नाणी देऊन सौदा ठरवणाऱ्या आणि सौद्यानंतर ग्राहकांना मारहाण करणाऱ्या टोळीचा खामगाव पोलिसांनी आज पहाटे पर्दाफाश केला आहे. १५ लाखाच्या या फसवणूक प्रकरणी परिस्थितीजन्य पुराव्याच्या आधारे आज पहाटे उपविभागीय पोलिस अधिकारी अमोल कोळी यांच्या पथकाने अंत्रज येथे कोंबींग ऑपरेशन राबवले. या ऑपरेशन दरम्यान २५ संशयीतांसह दोन देशी कट्टे, शस्त्रात्र आणि नकली सोन्याची नाणी असा एकुण ३१ लाख ७९ हजार ६५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ताब्यातील टोळीने ५ मे रोजी औरंगाबाद येथील एका व्यापाऱ्याची फसवणूक केली होती. याप्रकरणी तपास सुरु होता. याप्रकरणी मिळालेली गोपनीय माहिती व परिस्थितीजन्य पुरावे यांची सांगड घालत उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल कोळी यांनी आपल्या अख्त्यारीतील पोलिस अधिकाऱ्यांसह कर्मचारी वर्गाच्या मदतीने गुरुवारी पहाटे चिखली रस्त्यावरील अंत्रज येथे कोंबींग ऑपरेशन राबवले. या कारवाईत शहर पोलिस स्टेशनचे पोलिस निरिक्षक सुनिल अंबुलकर, शिवाजी नगरचे पोलिस निरिक्षक सुनिल हुड, शेगाव शहर पोलिस स्टेशनचे निरिक्षक संतोष टाले, गौरव सराग यांच्यासह पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांचे पथक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. वारंवार सोन्याच्या नाण्यांचे आमिष दाखवत नकली सोन्याचे नाणे देऊन फसवणूक करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करणारी टोळी उघडकीस आणल्याबद्दल जिल्हा पोलीस अधिक्षक अरविंद चावरीया यांनी पथकाचे अभिनंदन केले आहे. याप्रकरणी ग्रामीण पोलीस स्टेशनला गु.र.न.१६३/२१ भादवि ३९५, ३९७, ४२०,१२०नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता.

अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या ट्रकवर एलसीबीने केली कारवाई

सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी

सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यात भीमा नदीच्या पात्रातून बेकायदेशीर वाळू उपसा मोठ्या प्रमाणात सुरू आहे. अक्कलकोट येथील महसूल अधिकारी व पोलीस प्रशासन काही चिरीमिरीमुळे कारवाई करीत नाही. वाळू उपसा मोठ्या प्रमाणात सुरु असल्याने सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांनी स्थानिक गुन्हे शाखेला कारवाई करण्याची आदेश दिले आहेत. त्या अनुषंगाने २७ एप्रिल २०२१ रोजी अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्याच्या हद्दीत मौजे मैंदर्गी गावाजवळील शाब्दी पेट्रोल पंपासमोर रोडवर एक भारत बेंझ कंपनीचे ट्रक गुलबर्गा येथून एकूण ७ ब्रास वाळू चोरून घेऊन जात असताना मिळून आला आहे. ट्रक व वाळूसह मिळून २५,७०,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करून ट्रक वरील चालक आरोपी मल्लिनाथ शिवानंद झळके वय २२ रा. लिंबिचिंचोळी ता दक्षिण सोलापूर जि सोलापूर याच्याविरुद्ध अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्यात गु.र.नं. १७१/२०२१ भादंविक ३७९ पर्यावरण का कलम ९, १५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही सदरची कारवाई सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली पोलीस हवालदार राजेश गायकवाड, पोलीस हेड कॉन्स्टेबल विजय भरले. पोलीस नाईक रवी माने, हरी पांढरे, पोलीस कॉन्स्टेबल सचिन गायकवाड आदींनी बजावली आहे.

नकार दिल्याने प्रेयसीच्या चिमुकलीचे केले अपहरण

आरोपीस अवघ्या सहा तासात ठोकल्या बेड्या

डोंबिवली/राजेंद्र वेदांते

विवाहित प्रेयसीने सोबत राहायला नकार दिल्याच्या रागातून प्रियकराने तिच्या तीन वर्षीय चिमुकलीचे अपहरण केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी डोंबिवलीतील मानपाडा पोलिसांनी चिमुकलीचे अपहरण करणाऱ्या आरोपील अवघ्या सहा तासाच्या आत बेड्या ठोकल्या. दिनेश तिवारी (४०) असे अटकेतील प्रियकराचे नाव आहे. डोंबिवलीच्या पूर्व भागात राहणाऱ्या ३६ वर्षीय विवाहित महिलेचे दिनेश तिवारी नावाच्या व्यक्तिसोबत मैत्री झाली. सुरवात मैत्री पासून झाली. कालातरांने दोघांमध्ये प्रेमसंबंध निर्माण झाल्याने तीन महिने ही महिला आरोपी दिनेश सोबत राहिली. क्षणिक सुख उपभोगण्यासाठी दोघेही एकरूप झाले होते. परूंतू प्रेमाचा आणि शारीरिक आकर्षणाचा झरा आटल्यानंतर दोघांमध्ये वाद सुरु झाले. प्रियकराच्या रोजच्या भांडणाला ती महिला कंटाळली होती. हा कधीच सुधारणार नाही. याची खात्री पटल्यानंतर पिडीत महिलेने पुन्हा पहिल्या पतीचे घर गाठले. यामुळे दिनेश तिवारी संतापला होता. हि अचानक कशीकाय मला सोडून जाऊ शकते.हा विचार करीत त्याचा रागाचा पारा वाढत होता. म्हणून दिनेशने आपल्या प्रियेसीला धडा शिकवण्याचा कट रचला यासाठी त्याने प्रियेसीच्या मुलीचे अपहरण करण्याचे ठरवले.तिच्या मुलीचे अपहरण केले तर ती मुलीला सोडवण्यासाठी

आपल्याकडे येईल असा त्याचा समज झाला होता. पीडित महिलेला दोन मुली असून एक ६ वर्षाची तर दुसरी तीन वर्षाची आहे. आरोपी दिनेश हा तीन दिवसापूर्वी महिलेला भेटण्यासाठी आला असता त्याने पुन्हा सोबत राहण्यासाठी हट्ट केला. मात्र महिलेने त्याच्यासोबत जाण्यास नकार दिला. यावरून त्याच्यांत वाद झाला, तिने शेजारांच्या मदतीने त्याला पिटाळून लावले. यामुळे दिनेशचा राग उफाळून आला. एक दिवस दिनेश माफी मागण्याच्या बहाण्याने पिडीत महिलेच्या घरी आला. तेव्हा ती दोन्ही मुलींना घेऊन झोपली होती. हिच संधी साधत त्याने पिडीतेच्या तीन वर्षीय मुलीला तिच्या कुशीतून काढून घेऊन तिचे अपहरण केले. या प्रकरणी पिडीत महिलेने मानपाडा पोलीस ठाण्यात मुलीच्या अपहरणाची तक्रार दाखल केली. पोलिसांनी अपहरणाचा गुन्हा दाखल होताच गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून तपास सुरु केला. मात्र पोलिसांकडे या घटने विषयी कोणताही सुगावा नव्हता. तेव्हा एका महिलेने पोलिसांना सांगितले की, तिचा एका मित्रसोबत वाद झाला होता. या एकाच धाग्याच्या आधारे मानपाडा पोलिसांनी या घटनेचा तपास सुरु केला पोलिसांनी संपूर्ण डोंबिवली पालथी घातली आणि अवघ्या सहा तासाच सहाय्यक पोलिस निरीक्षक अविनाश पाळदे, श्रीकृष्ण गोरे यांच्या पथकाने आरोपीला बेडय़ा ठोकल्या आणि या अपहरण नाट्यावर पडदा पडला. तपास पथकाने अपहरण केलेल्या चिमुकलीची सुखरूप सुटका करून त्या चिमुकलीस तिच्या आईच्या स्वाधीन केले. याप्रकरणाची गंभीर दखल घेऊन मानपाडा पोलिसांनी वेगाने तपास करून आरोपीच्या मुसक्या आवळल्यामुळे ठाणे पोलीस आयुक्तांनी तपास पथकाचे कौतुक केले आहे.

थोडक्यात वृत्तांत

देवणीत वादळी वाऱ्यामुळे मोठे नुकसान!

देवणी : देवणी तालुक्यात वादळी वाऱ्याने अनेकांचे घरावरील पत्रे व वेअर हाऊस वरील अख्खे शेड उपटून पडले. शिवाय आंबा बागेचा मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. ही घटना गुरुवार दि.६ मे रोजी सायंकाळ च्या सुमारास घडली. देवणी तालुक्यातील सावरगाव येथील दत्तात्रे भुक्केवाड यांच्या आंबा बागेतील आंब्याचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. वादळी वाऱ्याने ३५ झाडाखाली आंब्याचा सडा शिंपडल्या सारखे दिसून आले. शिवाय बागेतील ८ आंब्याची झाडे मोडून पडली आहे. बागेला कृषी अधिकारी अंकुलवार यांनी भेट देऊन नुकसानीचा पंचनामा केला आहे. शासनाच्या वतीने नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी शेतकरी भुक्केवाड यांनी केली आहे. दरम्यान वादळी वाऱ्यात देवणी येथील रसीका वेअर हाऊस चे वरील अख्खे शेड उपटून दुसऱ्या ठिकाणी कोसळले, यात सुदैवाने जीवीत हाणी झाली नाही, मात्र वेअर हाऊसचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले आहे.

नागेश हडपेंची पदोन्नतीवर नाशिकला बदली

जळगाव : जळगाव पोलिस अधिक्षक कार्यालयातील कार्यालय अधिक्षक नागेश काशिनाथ हडपे यांची पदोन्नती झाली आहे. नागेश हडपे यांची पोलिस आयुक्त नाशिक शहर येथे प्रशासकीय अधिकारी म्हणून पदोन्नती झाली असून ते लवकरच नवीन पदाची सुत्रे हाती घेणार आहेत. त्यांच्या या पदोन्नतीबद्दल त्यांना पोलिस अधिक्षक डॉ. प्रविण मुंढे व सर्व वरिष्ठ अधिकारी वर्गाने तसेच कार्यालयीन कर्मचाऱ्यांनी पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

सुभद्राबाई कदम यांचे निधन

औसा : तालुक्यातील मौजे काळमाथा गावातील रहिवाशी सुभद्राबाई कालिदासराव कदम यांचे राहत्या घरी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ६८ वर्षाच्या होत्या. दि. ३ में रोजी त्यांच्या पार्थीवावर गावातील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात मुली, मुले, जावाई, सुन, नांतवडे आसा मोठा परीवार आहे.

लिंबराज कदम यांचे निधन



लातूर : औसा तालूक्यातील काळमाथ येथील रहिवाशी लिंबराज एकनाथराव कदम यांचे वृध्दपकाळाने निधन झाले. ते मृत्यू समयी ७५ वर्षाचे होते. दि. ५ में २०२१ रोजी काळमाथा गावातील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. ते वारकरी संप्रादयाचे उपासक होते. त्यांच्या पश्चात तीन मुली, तीन मुले, जावाई, सुन, नांतवडे आसा मोठा परीवार आहे.

अवकाळी पावसात विज पडून म्हैस दगावली

देवणी : देवणी तालुक्यातील सय्यदपूर येथील शिवारात झाडाखाली बांधलेल्या म्हशीवर वादळी वाऱ्यात झालेल्या पावसात विज कोसळली, यात म्हशीचा जागीच मृत्यू झाला. ही घटना शुक्रवार दि.७ मे रोजी सायंकाळच्या सुमारास घडली. सय्यदपूर येथील शेतकरी सोपान विठ्ठलराव पाटील यांची जमीन सर्वे नंबर ४७ मध्ये झाडाच्या बुडाला बांधलेल्या सहा महिन्याच्या गाभण म्हशीवर विज कोसळल्याने यात म्हशीचा जागीच म्हशीचा मृत्यू झाला. सोपान पाटील यांनी आपली मुलगी नुकतीच बाळांतपणासाठी येणार असल्याने परवाच सदरील म्हैस दुभत्यासाठी विकत आणल्याचे शेजाऱ्यांनी सांगितले. घटनेची माहिती देवणी तहसील कार्यालय व मंडळ अधिकारी वलांडी यांना कळविण्यात आली असून सदरील शेतकऱ्याचा ७० हजार रुपयांचा नुकसान झाला आहे. असा प्राथमिक अंदाज वर्तविण्यात आला आहे.

देवणी येथील ग्रामीण रुग्णालयात डॉक्टरांची पदं रिक्त असताना देवणीतील डॉक्टराची प्रतिनियुक्ती उदगीरात

देवणी/प्रतिनिधी

देवणी येथील ग्रामीण रुग्णालयात डॉक्टरांचे पदे रिक्त असताना तरीदेखील तेथील एका महिला डॉक्टराला उदगीर येथे प्रतिनियुक्ती दिली आहे. ते तात्काळ रद्द करून त्यांना देवणी येथे रुजू करुन घ्यावे अशी मागणी सोमवार दि.३ मे रोजी आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांच्या कडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, कोरोनाच्या पार्श्वभूमीवर लातूर जिल्हयातील सर्व तालुक्यातील ग्रामीण रुग्णालय येथे रेमडीसीवर इंजेक्शन दिले जाते. मात्र देवणी येथील ग्रामीण रुग्णालय येथे रेमडीसीवर इंजेक्शन उपलब्ध अद्यापही उपलब्ध नाही. परिणामी अनेक रुग्ण मरण पावत आहेत. तसेच रुग्णालयामध्ये तज्ञ (M.B.B.S.) डॉक्टर नसल्यामुळे रुग्णांचे हाल होत आहेत व रुग्णांना उदगीर येथील उपजिल्हा रुग्णालय येथे उपचारासाठी पाठविण्यात येत आहे. त्यामुळे तेथे रुग्णांना बेड न मिळणे व ऑक्सीजन न मिळणे यामुळे अनेक रुग्ण दगावत आहेत.

तसेच डॉ.आरती वाडीकर यांची मुळ नियुक्ती देवणी येथे असताना त्यांना उदगीर येथे प्रतिनियुक्ती देण्यात आलेली आहे. ती तात्काळ रद्द करून त्यांना देवणी येथे रुजू करण्याचे आदेश देण्यात यावे, अशा मागणीचे निवेदन भाजयुमोचे देवणी तालुकाध्यक्ष रामलिंग शेरे यांनी आमदार संभाजी पाटील निलंगेकर व जिल्हाधिकारी लातूर यांना दिले आहे.

माजी शिक्षण विस्तार अधिकारी अशोक पाटील यांचे दुःखद निधन

वाडा/प्रतिनिधी

वाडा शहरातील गांवदेवी मित्र मंडळाचे जेष्ठ सदस्य व मार्गदर्शक माजी शिक्षण विस्तार अधिकारी अशोक काशिनाथ पाटील यांचे अल्पश्या आजाराने दुःखद निधन झाले. तालुक्यात सर्वश्रुत असलेले अ.का. पाटील यांनी ठाणे येथे उपचारा दरम्यान अखेरचा श्वास घेतला. त्यांच्यावर कोरोनाचा संसर्ग झाल्याने त्यांच्यावर उपचार चालू होते मात्र ते जास्त काळ या आजाराचा सामना करू शकले नाहीत, त्यांच्या जाण्याने समस्त पाटील परिवार व परिसरातील आप्त नातेवाईक तसेच त्यांच्या हितचिंतकांवर मोठा आघात झाला असल्याची भावना बोलली जात आहे. अ.का. पाटील हे एक उत्कृष्ट शिक्षक तर होतेच त्याच बरोबर त्यांनी समाज कार्यातही चांगला ठसा उमटवला होता. ते उत्कृष्ट लेखकही होते. सामाजिक सांस्कृतिक व धार्मिक कार्यात ते नेहमीच पुढे असायचे. दररोज किमान २ तास लिखाण करणे हा त्यांचा छंद होता. रोज भेटणाऱ्या मान्यवर, महत्वाच्या, सामान्य व्यक्तीच्या चांगल्या स्वभावाचे ते लिखाण करायचे. समाजातील किती व्यक्ती त्यांच्या संपर्कात होती त्यांचे सहकारी, नातेवाईक, मित्र मंडळी यांची एक स्मरणपत्रिका त्यांनी तयार केली त्या पुस्तकाचे वितरण ते करत होते. गरिब व गरजु विद्यार्थ्यांना ते नेहमी आर्थिक मदत करत. अशा या महान विभूतीच्या अकाली मृत्यूने हळहळ व्यक्त केली जात आहे.

८८ वर्षीय हाजी जाफरसाब सौदागर यांनी केली कोरोनावर मात

देवणी/प्रतिनिधी

देवणी तालुक्यातील वलांडी येथील ८८ वर्षीय हाजी जाफरसाब हसनोद्दीन सौदागर यांनी कोरोनाच्या दुसऱ्या लाटोवर मात करून खरे कोरोना योद्धा ठरले. हाजी जाफरसाब सौदागर यांना २१ एप्रिल रोजी कोरोनाचे लक्षण जाणवू लागल्याने त्याना उदगीर येथील खाजगी तथा कोविड रुग्णालयात तपासणी केली व तेथील डॉक्टरनी गृहविलगीकरण करण्याचा सल्ला दिला व औषधोंपचार चालू केले वलांडी येथे गृहविलगीकराणामध्ये असताना अचानक त्याची प्रकृती खालावल्याने त्यांना तात्काळ लातूर येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. हाजी जाफरसाब यांचे सहा मुले पदवीधर असून तीन शासकिय सेवेत आहेत. त्यांचे सर्व मुले हे ५० वर्षाच्या पुढचे वयाचे आहेत. वयाचा विचार करता जाफरसाब याचे सर्व तरुण नातवंडेपैकी एक नातू डॉक्टर व आठ नातू आभियांत्रीकी शिक्षण पूर्ण केलेल्या नातवांनी आजोबाची सेवा करण्याचा मानस केला. व जाफरसाब याच्या एकाही मुलाला त्यांच्या संपर्कात येऊ दिले नाही. तर रुग्णालयात आजोबांची सेवा व देखभाल नातवानी केली व त्यांच्या सुना लातूर येथे खोली घेऊन सासऱ्यासाठी शासनाच्या निर्देशानुसार सकस व योग्य आहाराची सेवा कोली व अखेर कोरोनाच्या दुसरी तिव्र लाटेवर हाजी जाफरसाब सौदागर यांनी मात केली. याबाबत त्यांचे नातू डॉ. जावेद सौदागर म्हणाले की कोरोनाचे लक्षणे जाणवताच योग्य त्या चाचण्या करून घ्यावेत व उपचारादरम्यान सकस आहार दिल्यास कोरोनावर सहज मात करू शकतो यांचे उदाहरण म्हणजे माझे ८८ वर्षीय आजोबा होय.

देवणी तालुक्यातील बोगस डॉक्टरांवर कारवाईसाठी तालुका समिती गठीत

देवणी/प्रतिनिधी

देवणी तालुक्यातील बोगस डॉक्टरांवर अंकुश लावण्यासाठी गटविकास अधिकारी मनोज राऊत यांच्या अध्यक्षतेखाली बुधवार दि. ५ मे रोजी त्रिसदस्यीय समिती गठीत करण्यात आली आहे. शासन निर्णयाच्या अधिन राहून गटा अंतर्गत असलेल्या गावामध्ये बोगस डॉक्टर विरुद्ध कारवाई करणे बाबत सुचित केल्या नुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या स्तरावरील गावामध्ये नियंत्रण ठेवण्यासाठी गठीत समितीच्या अध्यक्षस्थानी देवणी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी मनोज राऊत तर सचिव म्हणून तालुका आरोग्य अधिकारी दिलीप गुरमे व तसेच सदस्य म्हणून आरोग्य पर्यवेक्षक अशोक महस्के यांची निवड करण्यात आली आहे. तरी संबंधित गावच्या ग्रामसेवकांश बोगस डॉक्टर व अवैद्यकीय व्यवसाय करणारे व्यक्ती आढळून आल्यास संबंधितांचे नावसह तपशील समितीला कळवावे असे गावागातील ग्रामसेवकांना पत्राद्वारे कळविण्यात आले आसल्याचे सांगण्यात आले आहे.

10 TO 16 MAY 2021 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 08/05/2021 6:42 PM Page 1

ई-पास बनवून देण्याच्या बहाण्याने नागरिकांची फसवणूक करणाऱ्या भामट्याला पुण्यातून अटक

लातूर/प्रतिनिधी

ई-पास बनवून देतो म्हणून पैसे लाटणाऱ्या ठगाला लातूर सायबर सेलच्या पोलिस पथकाने पुणे येथून अटक करत उत्कृष्ठ कामगिरी केली आहे. या प्रकरणातील ठकबाजा विरोधात शिवाजी नगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिस सुत्रांकडून मिळालेली माहीती अशी की ०५ में २०२१ रोजी शिवाजी नगर पोलीस ठाण्यात एक इसम ई-पास तयार झाला का ही विचारणा करण्यासाठी गेले होते. तेंव्हा सदर इसमास शिवाजीनगर पोलिसांनी सविस्तर माहितीसाठी सायबर सेल येथे जाण्यास सांगितले. तेव्हा ते इसम सायबर सेल येथे आले व त्यांनी सांगितले की, मी ई-पास मिळवण्यासाठी सोशल मीडियाच्या पोस्ट वर आलेल्या एका मोबाईल क्रमांकावर संपर्क साधून ट्रॅव्हल ई-पास बाबत विचारणा केली असता त्या मोबाईल क्रमांका वरील अज्ञात इसमाने ई-पास मिळून देण्याचे कबूल केले. व त्यासाठी २०००/- रुपये फीस असल्याचे सांगून ई-पास साठी फक्त आधार कार्ड व फिटनेस सर्टिफिकेट लागेल असे सांगून स्वतः फॉर्म भरून मंजूर करणार असल्याची हमी दिली.त्यामुळे नमूद अज्ञात इसमावर विश्वास ठेवून मी ऑनलाइन पद्धतीने फोन पे वरून अज्ञात इसमाच्या अकाउंटवर पैसे पाठविले परंतु पैसे देऊन ही ई-पास मंजूर न झाल्याने अधिक विचारपूस करण्यासाठी सायबर सेल येथे आलो आहे असे सांगितले.

कोविड-१९च्या अनुषंगाने अत्यावश्यक कारणाशिवाय विनाकारण प्रवास करणारे लोकांवर आळा घालण्याकरीता शासनाने चालू केलेल्या ई-पास करिता कसल्याही प्रकारची फी आकारली जात नाही. तरीपण कोणीतरी अज्ञात व्यक्ती ई-पास मंजूर करून देतो म्हणून पैशाची लूट करत असल्याचे लक्षात आल्याने सायबर सेल येथे नेमणुकीस असलेले पोलीस अमलदार रियाज अयुबसाब सौदागर यांच्या फिर्याद वरून शिवाजीनगर पोलिस ठाण्यात अज्ञात इसमा विरुद्ध गुन्हा रजिस्टर क्रमांक १८२/२०२१ कलम ४२० भादवि व ६६(c) माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. फसवणूक झालेल्या इसमाकडून मिळालेल्या माहितीचा तांत्रिक विश्लेषण करून मिळालेल्या माहितीच्या आधारे जिल्हा पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे अपर पोलीस अधीक्षक हिंमत जाधव यांचे मार्गदर्शनात अज्ञात इसमाचा शोध घेण्याकरिता सायबर सेलचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुरज गायकवाड, पोलीस अमलदार संतोष देवडे, रियाज सौदागर, रवी गोंदकर, यशपाल कांबळे यांचे पथक तयार करून मिळालेल्या तांत्रिक माहितीच्या आधारे पथकास लागलीच पुणे येथे रवाना करण्यात आले. सदर पथकाने स्थानिक पोलिसांच्या मदतीने आरोपीस काळेवाडी फाटा, पिंपरी चिंचवड, पुणे येथून ताब्यात घेण्यात आले. ताब्यात घेण्यात आलेल्या इसमास त्याचे नाव विचारले असता त्याने आपले नाव अनमोल पाटील राहणार लातूर हल्ली मुक्काम काळेवाडी फाटा, पिंपरी चिंचवड, पुणे येथे असल्याचे सांगून लोकांकडून पैसे घेऊन ट्रॅव्हलिंग ई-पास देत असल्याचे मान्य केले त्यावरून नमूद आरोपीस ताब्यात घेऊन पोलीस ठाणे शिवाजी नगर येथे दाखल गुन्ह्याच्या अधिक तपास कामी पोलीस ठाणे शिवाजीनगर यांचे ताब्यात देण्यात आले. गुन्ह्याचा अधिक तपास शिवाजी नगर पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुनीलकुमार पुजारी हे करीत आहेत.लातूर जिल्हा पोलीस दलाकडून आवाहन करण्यात येते की, ट्रॅव्हल ई-पास ही शासनाकडून अत्यावश्यक प्रवासाकरीता देण्यात येणारी निशुल्क सेवा असून त्यासाठी कसल्याही प्रकारचे शुल्क आकारण्यात येत नाहीत. त्यामुळे जनतेने कसल्याही प्रकारच्या अफवावर किंवा फसव्या जाहिरातीवर विश्वास न ठेवता रीतसर प्रक्रियेचा अवलंब करावा असे अव्हान पोलिसदलाच्या वतीने केले आहे.

सागर ठाकरे यांच्या प्रयत्नाने 'कोरोना' लसीकरण

वाडा/प्रतिनिधी

सद्या महाराष्ट्रासह संपूर्ण भारत देशात कोरोना थैमान घालत असताना वाडा व तालुक्यातील ग्रामीण भागात देखील त्याने आपली मुळं घट्ट पसरायला सुरुवात केली आहे. लोकांच्या मनातील लसीकरणाची भीती दूर व्हावी आणि कोरोना महामारी नियंत्रणात येण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र परळी, वाडा अंतर्गत न्यू इंग्लिश स्कुल सोनाळे येथे नागरिकांच्या आरोग्याच्या सोयीसाठी कोरोना प्रतिबंधक लसीकरण मोहीम पंचायत समिती सदस्य सागर ठाकरे यांच्या प्रयत्नांने राबविण्यात आली. या प्रसंगी माजी महिला बालकल्याण सभापती अनुष्का अरुण ठाकरे, गट विकास अधिकारी पंचायत समिती वाडा किशोर सोनटक्के, पंचयात समिती, ग्रामविकास अधिकारी थालेकर, तालुका आरोग्य अधिकारी संजय बोरपुल्ले, माजी पचायत समिती सदस्य स्नेहा जाधव, सोनाळे सरपंच अरुणा गुरोडे, उपसरपंच पंढरी मराडे, सामाजिक कार्यकर्ते अरूण ठाकरे, शिवाजी साळुंखे, अशोक गव्हाळे, भाऊ साबळे कांतीलाल म्हसकर व आरोग्य विभागाचे डॉ. मीनल पाटील, डॉ. तेजश्री पाटील व ग्रामसेवक पल्लवी चौधरी, आरोग्य कर्मचारी, आशा कर्मचारी उपस्थित राहून १५० नागरिकांना लसीकरणाचा लाभ देण्यास सहकार्य केले.

दरम्यान लस घेण्यासंदर्भात अजूनही ग्रामीण भागातील लोकांच्या मनात संभ्रमावस्था आहे . त्यांच्या मनातील भीती दूर होऊन सकारात्मक वातावरण तयार व्हावे म्हणून हा छोटासा प्रयत्न, असे वाडा पंचायत समिती सदस्य सागर ठाकरे यांनी सांगितले.

अक्कलकोट उत्तर पोलीस स्टेशन कडुन नागरिकांना मास्क वाटप

सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी

अक्कलकोट उत्तर पोलीस ठाणे कडुन सर्वसामान्य जनतेला पोलीस निरीक्षक गोपाळ पवार यांच्या हस्ते मास्क वाटप करण्यात आले. अक्कलकोट शहर आणि तालुक्यातील कोव्हीड रुग्णाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. पोलीस प्रशासन आपले पद्धतीने रोजची कोरोनाच्या अनुषंगाने कारवाई सुरूच आहे. तरी परंतु अक्कलकोट शहरातील काही नागरिक तोंडाला मास्क न लावणे, रुमाल बांधून घेणे, साधे कापड असे बांधून वावरताना दिसल्याने नूतनच पदभार घेतलेले पोलीस निरीक्षक गोपाळ पवार यांनी सामाजिक बांधिलकी जपत जनतेसाठी आज अत्यावश्यक सेवेच्या वेळेमध्ये सतत लोकांची ये-जा होणाऱ्या एसटी स्टँड परिसरात व कारंजा चौक परिसरात या महत्वाच्या दोन ठिकाणी

अत्यावश्यक कामासाठी बाहेर पडलेल्या सर्वसामान्य जनतेला ८०० मास्क वाटप करण्यात आले.

घरी रहा सुरक्षित रहा बाहेर विनाकारण फिरू नका शहरात व ग्रामीण भागात दिवसेंदिवस रुग्ण संख्या वाढत आहे असेही आवाहन केले. तसेच पोलीस ठाणेच्या मेगा फोनद्वारे लोकांमध्ये जागरूकता व सुरक्षिततेची जाणीव करून कोरोनाच्या नियमाचे काटेकोरपणे पालन करणे बाबतचे आवाहन अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गोपाळ पवार यांनी केले.

वसई-विरार पालिका क्षेत्रात लसीकरण केंद्रें वाढवून २४ तास सुरू ठेवा -रणधीर कांबळे

वसई/प्रतिनिधी

कोरोनाची दुसरी लाट ही भयानक रूप धारण करून आली आहे. प्रत्येक परिवाराने आपल्या परिजनांना, स्वकियांना व मित्रपरिवारांना गमावल्याचे दु:ख अनुभवले आहे. सद्याच्या परिस्थितीत आपल्यापुढे एकमेव पर्याय आहे तो लसीकरण. लसीकरण केंद्र वाढविणे यास प्राथमिकता देणे गरजेचे आहे. आपण गोलानी येथील आग्रवाल या ठिकाणी १८ ते ४४ वयोगटातील व ४५च्या पुढील सर्वांसाठी लसीकरण केंद्र सुरू करित आहात या बद्दल आपले व सभापती कन्हैया भोईर यांचे अभिनंदन! पण... लसीकरणाचा तुटवाडा पडणार नाही याची काळजी घ्या व या ठिकाणीच नाही तर आपण ज्या ज्या ठिकाणी लसीकरण करित आहोत त्या सर्व ठिकाणी नागरिकांना २४ तास सेवा द्या, जेणेकरून या तरूण वर्गापासून ते वयोवृध्दांपर्यंतचे आरोग्य धोक्यात जाणार नाही. ट्रेसिंग, टेस्टींग व ट्रिटमेंट या बरोबरच लसीकरण हे ही जलद गतीने होणे गरजेचे आहे. आपल्याकडे कमी मनुष्यबळ आहे याची कारणे न देता आहे त्यामध्ये उत्तम नियोजन करणे गरजेचे आहे. या महामारीच्या काळात खऱ्या अर्थाने लोकप्रतिनिधींची महापालिकेत गरज होती. सर्व सामान्य नागरिक

आपापल्या विभागातील लोकप्रतिनिधींना भेटून आपल्यामार्फत आपल्या अडचणी सहज सोडवून घेत होते. आज ही उणीव भासत आहे. आपला प्रशासकिय कार्यकाळ असल्याने सर्वोतोपरी आधिकार आपले आहेत. लोकाभिमूक योग्य निर्णय घ्याल तर लोकं स्तुती करतील पण जर वेळेत योग्य निर्णय नाही घेतले तर त्याची जबाबदारी सुद्धा तुम्हालाच घ्यावी लागेल व भविष्यात उत्तरेही द्यावी लागतील हे लक्षात असू द्या. आपणास विनंती आहे की, आपण सर्व सामान्यांचे फोन रिसिव्ह करा जे आपण करित नाहीत, आपण लोकसेवक आहोत याचे भान ठेवा आणि आपल्या आधिकाऱ्यांनाही तशा सूचना करा. मनमानी कारभार करू नका... या परिस्थितीत खऱ्या अर्थाने आजी, माजी लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था, विविध उपक्रम राबविणारे मंडळे यांना सोबत घेऊन आपण अनेक उपक्रम सहज राबवून यातून आपल्या नागरिकांना आरोग्याची चांगली सेवा देऊ शकता. मी फक्त एवढीच विनंती करेन कि, आपल्याकडील आग्रवाल गोलानी या ठिकाणी सुरू होत असलेल्या लसीकरण केंद्रात दिवसरात्र सेवा द्यावी व या परिसरातील जास्तीत जास्त नागरीकांचे लसीकरण करावे, असे बहुजन विकास आघाडीचे रणधीर कांबळे यांनी पालिका आयुक्तांना निवेदन दिले आहे.

वाडा तालुक्यात रस्त्याच्या कडेला असलेल्या अतिक्रमणावर कारवाई

वाडा/वार्ताहर

राज्यासह पाळघर जिल्हा व वाड्यातही रुग्णसंख्या वाढतच आहे, कोरोना संक्रमण रोखण्यासाठी शासना कडून कोविड संदर्भातील नियमांचे काटेकोरपणे पालन करण्यात येत आहे. मात्र काही दुकान दारांकडून याचे उल्लंघन होत असल्याचे दिसून येते होते. अत्यावश्यक सेवा देणाऱ्या दुकानदारांना आपली दुकाने नियमांच्या अधीन राहून सकाळी ७ ते ११ वाजेपर्यंत उघडी ठेऊन सेवा पुरविण्याची मुभा देण्यात आली आहे. मात्र वाड्यातील भाजी विक्रेत्यांनी रस्त्याच्या कडेला थाटलेल्या दुकानांमुळे होणारी गर्दी पाहता सोशल डिस्टन्सिंगचा पुरता फज्जा उडाल्याचे चित्र दिसून येत होते. तर वाहतूक कोंडीने वाहन चालक व नागरिकही त्रस्त झाले होते. याची दखल वाडा नगरपंचाय व पोलीस प्रशासनाने घेऊन रस्त्याच्या दुतर्फा थाटलेली दुकाने हटवून त्यांना पांडूरंग जावजी हॉस्कुलच्या पटांगणात दुकाने लावण्याचे सुचविल्याने बुधवार पासून ही दुकाने या नवीन जागी थाटल्याने रस्ता खुला झाला असून वाहतूक कोंडीचा प्रश्नही निकाली निघाला आहे.

बरमदे हॉस्पिटलमध्ये कोरोनाबाधित गरोदर मातांसाठी कोविड सेंटर सुरु

लातूर/प्रतिनिधी

लातूर जिल्ह्यातील कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव पाहता कोरोनाबाधित गर्भवती महिलांनाही चांगल्या प्रकारची आरोग्य सुविधा उपलब्ध करून देता यावी या उद्देशाने आपल्या बरमदे हॉस्पिटलमध्ये मागील कांही दिवसांपासून गरोदर मातांसाठी कोविड सेंटर सुरु केल्याची माहिती हॉस्पिटलचे संचालक तथा ख्यातनाम स्त्री रोग व वंध्यत्व निवारण तज्ज्ञ डॉ. कल्याण बरमदे यांनी दिली.

डॉ. कल्याण बरमदे वैद्यकीय क्षेत्रांतील सेवेबरोबरच सामाजिक कार्यातही सतत सक्रिय असतात. कोरोना काळात त्यांच्याकडून केल्या गेलेल्या सेवाकार्याचा गौरव म्हणून लातूरच्या दिशा प्रतिष्ठानने नुकताच त्यांचा देवदूत पुरस्काराने सन्मानही केला आहे. मागच्या कांही दिवसांपासून लातूर जिल्ह्यात कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे. अशावेळी गरोदर मातांकरिता सर्व सोयी सुविधांनी परिपूर्ण असे कोविड सेवा केंद्र सुरु करणे नितांत गरजेचे बनले होते. समाजाची ही गरज लक्षात घेऊन आपल्या बरमदे हॉस्पिटलमध्ये कोविड सेंटर सुरु करण्याचा निर्णय आपण घेतल्याचे डॉ. कल्याण बरमदे यांनी सांगितले. कोरोना संक्रमित गर्भवती मातांवर चांगल्या प्रकारे उपचार केले गेल्यास त्यांचा आणि होणाऱ्या बाळाचाही धोका कमी होण्यास मदत होते, असे सांगून डॉ. कल्याण बरमदे म्हणाले की ,गर्भवती महिलेला कोरोनाची बाधा झाल्याचे लक्षात आल्याबरोबर कुटुंबियांनी थोडाही वेळ न दवडता तिला उपचारासाठी हॉस्पिटलमध्ये दाखल करणे आवश्यक आहे. योग्य निदान व त्वरित उपचाराने गरोदर माता आणि गर्भातील बाळ अत्यंत सुरक्षित राहण्यास मदत होते. गरोदर मातांनी आपली प्रतिकार शक्ती वाढविण्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांच्या सल्ल्याने सकस आणि पोषक आहार घेतला पाहिजे. त्याचप्रमाणे डॉक्टरांच्या मार्गदर्शनाप्रमाणे सर्व आवश्यक ते उपचारही नियमित घ्यायला हवेत. कारण गर्भारपणात गरोदर मातांची प्रतिकारशक्ती बऱ्याच अंशी कमी झालेली असते. योग्य त्या उपचारांबरोबरच नैसर्गिकरित्या आपली प्रतिकारशक्ती वाढविण्यावरही गर्भवती महिलांनी भर द्यायला हवा. अशावेळी त्यांना केवळ कोरोनाच नव्हे तर कोणत्याही विषाणू प्रादुर्भावापासून सुरक्षित ठेवण्यासाठी जास्तीत जास्त काळजी घेणे गरजेचे असते. गरोदर मातांनी आपल्या व आपल्या बाळाच्या सुरक्षिततेसाठी प्रसूतीपूर्वी कोरोनाची तपासणी करून घेणेही आवश्यक असल्याचे डॉ. बरमदे म्हणाले. कोरोना विषाणूचा दिवसेंदिवस वाढत जाणारा प्रादुर्भाव लक्षात घेता गरोदर महिलांसाठीही स्वतंत्र कोविड सेवा केंद्र सुरु करणे आवश्यक होते. समाजाची ही गरज लक्षात घेऊन आपण सदर केंद्र सुरु केल्याचेही त्यांनी सांगितले. आतापर्यंत या केंद्रात अनेक गरोदर मातांवर यशस्वी उपचार करण्यात आले आहेत. कुटुंबातील गर्भवती महिलेला कोरोनाची बाधा झाल्यास कुटुंबियांनी घाबरून न जाता तिच्यावर तज्ज्ञ डॉक्टरांच्या निगराणीखाली तात्काळ उपचार चालू केल्यास माता व होणाऱ्या बाळासाठी ते लाभदायक ठरते. कोरोनापासून बचावासाठी कोरोना प्रतिबंधक लस हाच एकमेव प्रभावी उपाय आहे. मात्र,गर्भवती महिलांना सध्या लसीकरण करू नये अशा सूचना केंद्र सरकारच्या निर्देशानुसार फॉगसी संघटनेने दिल्या आहेत. कांही दिवसांमध्ये यामध्ये संशोधन होऊन याचा फेरविचार होऊ शकतो, असेही डॉ. बरमदे यांनी सांगितले.

सोलापुरात रिक्षात विसरलेले १५ तोळे सोने प्रामाणिकपणे केले परत

सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी

सोलापूर शहरात १ मे रोजी रिक्षात विसरून गेलेल्या प्रवाशांची बॅगेत असलेले १५ तोळे सोन्याची दागिने व १५०० रुपये रोख रक्कम रिक्षा चालकाने प्रामाणिकपणे परत केल्याने सोलापूर सदर बझार पोलीस स्टेशन च्या वतीने त्या चालकाचा सत्कार करण्यात आला. शनिवारी १ मे रोजी संजीवनी नागनाथ सुरवसे (वय ६१, रा.जेऊर ता अक्कलकोट जि.सोलापूर) जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिक्षिका होत्या सेवानिवृत्त आहेत. त्यांनी आपल्या मुलीला सैफुल येथील न्यू लाईफ हॉस्पिटल येथे उपचारासाठी घेऊन गेले होते तेथून ऑटोरिक्षा ने श्री डायग्नोसिस येथे तपासणीकरिता आल्या होत्या. प्रवासादरम्यान त्यांची बॅग (पर्स) रिक्षामध्ये तसेच विसरून गेली होती. त्या बॅगेमध्ये १५ तोळे सोन्याची दागिने व दीड हजारांची रोख रक्कम होते. ही बाब लक्षात आल्यानंतर संजीवनी सुरवसे यांनी त्या रिक्षा वाल्याचा शोध घेतला परंतु रिक्षा वाला मिळून आला नाही.

सदर रिक्षा चालक अमोल अशोक शेमाड यांनी बॅग रिक्षामध्ये मिळून आल्याने आता त्या प्रवाशांना कुठे शोधायचे म्हणून त्याने माहिती पोलीस असलेले मेहुणे रवी देडे यांना दिले. त्यामुळे त्यांनी मिळालेले सोन्याची दागिन्याची बॅग तसेच सोलापूर शहर पोलीस नियंत्रण कक्ष येथे आणून दिले. त्यानंतर रिक्षाचालक अमोल शेमाड यांच्या प्रामाणिकपणाबद्दल सोलापूर सदर बझार पोलीस स्टेशनच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक कमलाकर पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी संजीवनी सुरवसे, सागर सुरवसे व पोलीस अधिकारी, पोलीस कर्मचारी उपस्थित होते.